MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ४/एप्रिल २०२५

## संपादकीय

### 'भारतीय ज्ञान - परंपरा' या विषयावर चर्चासत्र

आपल्या देशाला ज्ञानाची मोठी परंपरा आहे. गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र, योग, नाट्यशास्त्र, औषधनिर्मिती अशा अनेक क्षेत्रांत प्राचीन काळातील भारतीयांनी डोळ्यांत भरण्याजोगी प्रगती केली होती. एव्हढेच नव्हे तर, जगाला ज्ञान देण्याचे महत्त्वाचे कार्य आपल्या देशाने केले. असे जरी असले, तरी आपल्या देशातील बहुसंख्य लोक या ज्ञानापासून वंचित राहिले आणि हे सगळे ज्ञान जुन्या ग्रंथांपुरते मर्यादित राहिले. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात त्यांचा समावेश नसल्याने ते पुढच्या पिढीपर्यन्त पोहोचले नाही. हे टाळण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाने 'भारतीय ज्ञान – परंपरेला अध्यापनात पुरेसे महत्त्व दिले जावे' असे सुचविले. या सूचनेचा देशभर गांभीर्याने विचार करण्यात येत आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागात भारतीय ज्ञान नवीन पिढीपर्यन्त कसे पोहोचवावे यासाठी वेगवेगळे प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रयत्नांतील एक भाग म्हणून पुणे शहरात एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पुण्याच्या भारती विद्यापीठाने मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भारतीय ज्ञान – परंपरेचा 'अभ्यासक्रमात समावेश करण्यातील आव्हाने काय आहेत?' यावर विचार मंथन करण्यासाठी दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. चर्चासत्राचा मुख्य विषय IKS Teaching and Curriculum Designing: Challenges for Teachers and Future Pathways असा विस्तृत होता.

भारती विद्यापीठ हे एक स्वायत्त विद्यापीठ आहे. डॉ. पतंगराव कदम यांच्या अथक परिश्रमातून आकारास आलेल्या या विद्यापीठात अनेक विषय शिकविण्यात येतात. पुण्याच्या कात्रज अशा विस्तीर्ण परिसरात ते पसरले आहे. त्याचबरोबर पुण्याच्या एरंडवणे भागात विद्यापीठाचे काही विभाग आहेत. याच परिसरात असलेल्या 'यशवंतराव मोहिते कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने' या परिसंवादाचे यजमानपद स्वीकारले होते. याच महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे आयोजनाची जबाबदारी देण्यात आली होती. चर्चासत्राचे आयोजन 'लॉ कॉलेज सभागृहात' करण्यात आले होते. चर्चासत्राचे नियोजन खूप आधीपासून सुरू करण्यात आले होते. आयोजकांनी देशातील आणि परदेशांतील तज्ज्ञांशी संपर्क साधून त्यांना चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी आग्रहाचे निमंत्रण पाठवले होते. या कामात

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

संस्थेने काही समविचारी संघटनांची मदत घेतली. त्यांच्या विनंतीला मान देऊन विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. या चर्चासत्राचे उद्घाटन विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.

परिसंवादात विविध विषयांवर सांगोपांग चर्चा झाली. वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय ज्ञान परंपरा खूपच विस्तृत आहे. या सर्व विषयांतील तज्ज्ञ एकाच व्यासपीठावर आणणे कठीण असते. तरीही आयोजकांनी विज्ञान, गणित, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र अशा अनेक विषयांतील अभ्यासकांना एकत्र आणण्यात यश मिळविले. विशेष हे की, संत साहित्याचा देखील यात समावेश करण्यात आला होता. संतानी 'त्रिकालाबाधित सत्य' असे अजरामर साहित्य निर्माण केले आहे. ते समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज वक्त्यांनी व्यक्त केली. माझा भर 'भारतीय गणित' या विषयावर होता. भारतीय गणित खूपच जुने आहे. त्याचा समावेश शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अभावानेच होतो. हे चित्र बदलण्यासाठी काय करावे यावर मी माझे मत मांडले. २०१४ पासून मी भास्कराचार्य यांनी लिहिलेल्या 'लिलावती' ग्रंथावर कृतिसत्रे आयोजित करीत आहे. या कृतिसत्रांतील अनुभव सांगून प्राचीन भारतीय गणिताला विद्यार्थी कसा प्रतिसाद देतात हे मी विशद केले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्राचीन भारतीय गणित हा ऐच्छिक विषय म्हणून लागू केला. त्यांचे अनुभव प्रेरणादायक आहेत. त्याचबरोबर टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने' महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने काही वर्षांपूर्वी 'मुक्त शिक्षण स्रोत' नावाचा प्रकल्प राबविला होता. या प्रकल्पात विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी डिजिटल स्वरूपात साहित्य निर्माण करून ते विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले होते. या प्रयत्नांना चांगले यश मिळाले होते. या सादरीकरणाला परिसंवादात सहभागी झालेल्या सभासदांकडून चांगला प्रतिसाद मिळाला हे मी नमूद करू इच्छितो.

भारतीय ज्ञान पुढच्या पिढीला शिकवायचे असेल तर अतिशय पद्धतशीर प्रयत्न करावे लागतील. सर्वप्रथम योग्य ती साहित्य निर्मिती करावी लागेल. आजच्या घडीला बरेचसे साहित्य संस्कृत भाषेत उपलब्ध आहे. त्याचे स्थानिक भाषेत रूपांतर करून ते कमी दरात सर्वत्र उपलब्ध करून दिले पाहिजे. या कामी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे शक्य आहे. अध्यापनात भारतीय ज्ञानाचा समावेश करण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमांत बदल करावे लागतील. एवढे करून काम साधले असे म्हणता येणार नाही. हा अभ्यासक्रम प्रभावीपणे कसा शिकवावा यासाठी योग्य ती अध्यापन पद्धती विकसित करावी लागेल. यात ज्ञान रचनावादाचा प्रभावीपणे कसा वापर करता येईल याचाही विचार करावा लागेल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ज्ञानाचे आकलन किती झाले हे समजून घेण्यासाठी विशिष्ट मूल्यमापन पद्धती विकसित करावी लागेल.

भारतीय ज्ञानाचे प्रभावीपणे अध्यापन होण्यासाठी शिक्षकांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. जे शिक्षक आधीच सेवेत आहेत त्यांच्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करावे लागेल. तसेच, शिक्षकांच्या सेवापूर्व प्रशिक्षणात देखील योग्य ते बदल करावे लागतील. पाल्याच्या शिक्षणात पालकांचा महत्त्वाचा वाटा असतो. म्हणून पालकांसाठी देखील योग्य साहित्य निर्मिती करावी लागेल. आव्हाने अनेक आहेत. ती पेलली तरच भारतीय ज्ञान परंपरेला योग्य तो न्याय मिळेल असे आवर्जून सांगावेसे वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष सव्वीसावे/अंक ४/एप्रिल २०२५**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | यंत्रमानवाची कल्पना करणारे - 'समरांगण सूत्रधार' | प्रशांत पोळ | ३ |
| ३) | बहुरत्ना वसुन्धरा | नीला कोर्डे | ८ |
| ४) | 'A La Carte अलास्का!' | डॉ. जयश्री पवार | १३ |
| ५) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १६ |
| ६) | राष्ट्रीय सन्मानाचा अपमान टाळण्यासाठीच्या कायद्याची ओळख | डॉ. रुपाली श्याम जामोदे | २१ |
| ७) | मग तयांपाशी मी, असे ठरविले, माझे जाणे... | प्रमोद वसंत बापट | २२ |
| ८) | वक्फ कायदा सुधारणा विधेयक : ही विकृती संपायलाच हवी... | अभिजित जोग | २५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

\- संपादक

# यंत्रमानवाची कल्पना करणारे - 'समरांगण सूत्रधार'

*'समरांगण सूत्रधार' या ग्रंथावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ लेखक श्री. प्रशांत पोळ यांचा लेख - संपादक*




'समरांगण सूत्रधार' या ग्रंथावर शोध करणाऱ्या एका पाश्चात्त्य शोधकर्त्याने लिहून ठेवलंय की 'समरांगण सूत्रधार मध्ये वर्णन केलेले कळसुत्री यंत्रमानव जर निर्माण करता आले, तर एक यांत्रिक डिज्नीलैंड उभं करता येईल..!'

समरांगण सूत्रधार हा ग्रंथ अकराव्या शतकातला. सन १०२० च्या आसपास लिहिलेला. माळव्याचा पराक्रमी आणि विद्वान राजा भोज याने लिहिलेला किंवा संकलित केलेला अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ. मुळात हा ग्रंथ ओळखला जातो ते वास्तुशास्त्रासाठी. मंदिर शास्त्र, स्थापत्य शास्त्र, नगररचना शास्त्र, इमारतींचे बांधकाम, गृह नियोजन इत्यादी बाबतीत या ग्रंथात अत्यंत विपुल माहिती दिलेली आहे. नगर नियोजना संबंधात जी माहिती दिलेली आहे, ती वाचून आपण थक्क होऊन जातो ! हजार वर्षापूर्वीच्या त्या काळात, नगरं, महानगरं किती आखीव-रेखीव होती, रस्ते किती रुंद होते, राजप्रासाद आणि इतर प्रासादांची, मंदिरांची रचना किती तर्कपूर्ण पद्धतीने व्यवस्थित केलेली होती, याचं कौतुक वाटतं. आजच्या नगर नियोजनापेक्षा कितीतरी पुढे, कितीतरी चांगलं नियोजन त्या काळचे नियोजनकार (आर्किटेक्ट) करत होते, हे सारखं जाणवत राहतं.

या ग्रंथात एकूण ८३ अध्याय आहेत आणि एकूण श्लोकांची संख्या आहे, ७,५५१. घर बांधण्याच्या सामग्रीपासून ते प्रतिमांच्या / शिल्पांच्या भावमुद्रा, चित्रकला, नाट्यकला सारख्या कलांबद्दल माहिती, हास्य / करुण / शृंगार इत्यादी ११ रसांची माहिती, असं या ग्रंथाचं वैविध्यपूर्ण स्वरूप आहे. मात्र या सर्वांत ३१ क्रमांकाच्या अध्यायाने हा ग्रंथ वेगळा उठून दिसतो. या अध्यायाचं शीर्षक आहे - 'यंत्रविधानम्'. यात एकूण २२३ श्लोक आहेत, आणि वेगवेगळ्या यंत्रांविषयी माहिती दिलेली आहे.

ही यंत्रांविषयीची माहिती अक्षरशः अद्भुत आहे.

राजा भोज लिहितात, 'यंत्र' या शब्दाची व्युत्पत्ती 'यम' या ध्वनीतून झाली आहे. याचा अर्थ आहे - नियंत्रण करणे.

यदृच्छया प्रवृत्तानि भूतानी स्वेन वर्त्मना ।
नियम्यास्मिन नयतीयत् यद्यन्यमिति कीर्तितम् ।। (३१.३)

अर्थात, एक असे उपकरण, जे स्वतः, स्वतःच्या हालचालींवर, दिलेल्या कार्यावर आणि एकापेक्षा जास्त गोष्टींवर नियंत्रण ठेवून, इच्छित परिणाम साधू शकते, त्याला 'यंत्र' म्हणतात.

या संपूर्ण अध्यायाला, राजा भोज यांनी 'पंचमहाभूतांच्या' अर्थात, वायू, पृथ्वी, आकाश, अग्नी आणि जल या संकल्पनेतून उलगडून दाखवलंय. ऊर्जा निर्मिती बद्दलही या ग्रंथात बरंच लिहिलं आहे. ऊर्जेमुळे पदार्थाच्या वस्तुमानाला मिळणारी गतिशीलता, यावरचं विवेचन वाचून तर आपण थक्क होऊन जातो. यात पारद (पारा) चा भरपूर उल्लेख आलाय. पारद हे रसायन जल, अग्नी आणि वायू स्वरूपात होणाऱ्या प्रक्रियांच्या माध्यमातून ऊर्जा निर्माण करू शकते. अर्थात पारद हे उर्जेचं 'बीज' आहे.

गतिशीलतेप्रमाणे, यंत्रांचे चार प्रकार या ग्रंथात दिलेले आहेत –

१. स्वयंवाहक – जे स्वतः गतिशील असते.

२. सकृत्प्रेय – ज्याला किमान एकदा तरी 'प्रेरित' करावे लागते. (आधुनिक उदाहरण द्यायचे तर, जसं स्कूटर / मोटरसायकलला एकदा किक् दिली की ती बंद करेपर्यंत चालूच राहते.)

३. अंतरितवाह्य – जे अंतराळात काम करतात. (उदाहरणार्थ – विमान)

४. अदूरवाह्य – जे वहनाच्या प्रतीक्षेत असतात. यात 'स्वीय गती' आणि 'बाह्य गती' यंत्र असतात.

गंमत म्हणजे, या ग्रंथात, पुढे भौतिक शास्त्रात गाजलेले अनेक नियम, अगदी सहजगत्या सांगितले आहेत. 'उर्ध्वगामित्व' अर्थात, उंचावरून एखादी वस्तू जर जोराने खाली फेकली तर ती तितक्याच ताकदीनं वर येते (उसळते). हे तत्व पाण्यालाही लागू आहे.

'भारतीय ज्ञानाचा खजिना – भाग १' मध्ये याचा ओझरता उल्लेख केलेला आहे. पाणचक्कीची संकल्पनाच समरांगण सूत्रधार च्या ह्या ३१ व्या अध्यायात मांडलेली आहे. आजच्या भाषेत आपण म्हणू शकू अशी, हायड्रोलिक शक्तीने टर्बाइन चालवण्याची विधी यात दिलेली आहे.

धाराच जलभारश्च पायसो भ्रमणम् तथा ।
यथो च्छ्रायो यथाधिक्यम् यथा निरंध्रतापिच ।
एवमादिनी भूजस्य जलजानी प्रचक्षते ।।

अर्थात, जलधारा वस्तूला फिरवते. उंचावरून जलधारा पडली तर तिचा प्रभाव अधिक असतो आणि तिच्या वेगाच्या आणि वस्तूच्या भाराच्या प्रमाणात वस्तू फिरते. ज्या ऊर्जेमुळे यंत्र चालते त्याला भोज राजा, 'बीज' म्हणतात. यानुसार 'जल बीज' आणि 'वायु बीज' वापरून काम करणाऱ्या यंत्राचे सविस्तर वर्णन दिलेले आहे.

यंत्रांच्या कार्यक्षमतेबद्दलही यात विवरण आहे. यंत्रांचा 'परफॉर्मन्स' केव्हा चांगला असेल किंवा दुसऱ्या शब्दात, 'यंत्रांच्या गुणवत्तेचे मानक बिंदू' (Parameters) ही दिलेले आहेत. 'यंत्र कसे असावे' याचे वर्णन करताना भोज राजा लिहितात,' यंत्र हे इतरांना चटकन न कळेल अशा प्रकारचे (अलक्ष) असावे. ते वजनाला हलके असावे. सहसा आवाज न करणारे यंत्र अपेक्षित आहे (अगाढ). उच्च गुणवत्ता असलेल्या यंत्रांची गती समान (Linear) असली पाहिजे. यंत्र हे व्हायब्रेशन्स सहन करणारे, परंतु व्हायब्रेशन्स मुळे खिळखिळे होणारे नसावे (अशैथिल्यम). यंत्राला 'चिरकालित्वाचा' गुण हवा. अर्थात, त्या यंत्राचा 'लाईफ स्पॅन' मोठा हवा'. गंमत म्हणजे, यंत्राचा आवाज बाहेर जाऊ नये म्हणून यंत्रावरचे विशिष्ट ध्वनिरोधक आवरण असावे, असं यात म्हटलं आहे. म्हणजे आज जसे स्कूटर / मोटरसायकलला सायलेन्सर असते, किंवा जनरेटर्स ला आयसोलेशन माउंट असतो, त्या प्रकारे !

हे सारं लक्षात येतंय आपल्याला..? एखाद्या अभियांत्रिकी महाविद्यालयात, मेकॅनिकल इंजिनीयरिंगच्या

विभागात, 'मशीन्स'च्या वर्गात जाऊन बसल्यासारखं वाटतं ना? अद्भुत आहे हे सारं! आणि विशेष म्हणजे, युरोपात 'यंत्र युग' सुरू होण्याच्या कितीतरी वर्ष आधी, हे सर्व सविस्तर लिहून ठेवलंय.

भोज राजा इथेच नाही थांबलेत. पुढे तर त्यांनी अजून गमती दाखवलेल्या आहेत.

भोज राजाच्या अनुसार एखाद्या यंत्राचे तीन भाग असतात –

१. बीज (Source - Producer of Action)

२. किलक (Pin, bridging Power and Work)

३. शक्ती (त्या यंत्राने केलेल्या कामाचा परिणाम)

(आजच्या संदर्भात उदाहरण द्यायचं, तर सायकलचं देता येईल. यात 'बीज' म्हणजे पायडल मारणं. 'कीलक' म्हणजे सायकलची चेन आणि शक्ति म्हणजे सायकल पुढे जाणं.)

या तीन प्राथमिक (Basic) भागांच्या सहाय्याने, भोज राजाने अनेक यंत्रांचे विवरण दिलेले आहे –

दीपिका पुत्रिका यंत्र – दीप (दिवा) हातात घेतलेल्या लाकडी बाहुल्या, या यंत्राच्या साह्याने तालावर फिरतात आणि दिव्यात थोडं – थोडं तेल घालत असतात.

शुक–सारिका यंत्र – असे यंत्र, जे संगीताच्या तालावर थिरकत, विशिष्ट वाद्यांच्या आवाजात प्रेक्षकांचं मनोरंजन करेल.

योजन गमन यंत्र – असे यंत्र, ज्याद्वारे मनुष्य किंवा वस्तू प्रक्षेपित केली तर साधारण दहा ते बारा किलोमीटर दूर फेकल्या जाऊ शकेल. (सर्कशीत, तोफेतून कलाकारांना फेकतात. याचेच मोठे / भव्य स्वरूप म्हणजे हे यंत्र.)

नाडी प्रबोधन यंत्र – चक्रीय प्रणालीचा वापर करून हे यंत्र ठरावीक वेळेत दिलेले काम करत राहील. जर याला बाहुलीची (भोज राजाच्या भाषेत, पुत्रिकेची) जोड दिली, तर प्रत्येक आवर्तनात ती दिलेलं काम करत राहील.

उच्छायसमपात यंत्र – असे यंत्र, ज्यात नलिकेद्वारे जलाशयातून पाणी उंच उडवले जाते. (कारंजे)

स्वर निष्पादन यंत्र – वाऱ्याच्या सहाय्याने, सच्छिद्र अशा लाकडी बाहुलीच्या अथवा पक्ष्याच्या मुखातून, ढोल / मृदुंग / बासरी / शंख वगैरेंचे स्वर, वाद्यांसारखे निघतात.

अशा अनेक यंत्रांची माहिती भोज राजा देत असतात. पण खरी गंमत पुढेच आहे...

या समरांगण सूत्रधार मध्ये, भोज राजा विमानांची माहिती देतात. विमानांचे प्रकार सांगतात. अर्थात, विमान शास्त्राबद्दल यापूर्वीच महर्षी भारद्वाज आणि इतरही लोकांनी लिहून ठेवलं असल्याने, विमानाची माहिती हे महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं आहे ते, विमान उड्डाणासाठी भोज राजा 'पारा' या धातूचा उपयोग सांगतात. 'दारुविमानम्' (अध्याय ३१ मधील श्लोक ९५ ते ९८) मध्ये ते पक्ष्याच्या आकाराचे छोटे, आणि मंदिराच्या आकाराचे मोठे, अशा लाकडी विमानांचा उल्लेख करतात.

यात ते म्हणतात, 'लाकडी विमानाची रचना ही हलकी असावी. मोठ्या पक्ष्याप्रमाणे दोन्ही बाजूला पंख असावेत आणि पोटात पारा (पारद) इंधन भरलेले रसपात्र (सिलेंडर) असावे. त्याच्याखाली 'अग्नी आधार' (अर्थात भट्टी) असावी, जी पेटवल्यानंतर इंधनाची ऊर्जा निर्माण होऊन, आत बसलेल्या चालकाने पंख्यांचं संचलन केल्यास, विमान आकाशात उडू लागेल. जर

पारद इंधनाच्या एकापेक्षा जास्त टाक्या बसवल्या, तर विमान दूरवर जाऊ शकेल'.

इत्यमेव सुरमन्दिरतुल्यं संचालत्यं अलगु दारुविमानम्।
आदधीथा विधिना चतुरो अंतस्तस्य पारदाब्रुथां द्रुधकुम्भम्।।
अथा कपाल अहिता मंदा वह्नि प्रताप तत् कुम्भ भुव गुनेन।
व्योमनो झगत्यभरणत्वमेति संतप्त गर्जद्रसराजशक्त्या।।
(९७ आणि ९८)

यात पाऱ्याचा इंधन म्हणून वापर, ही कल्पनाच अफलातून आहे. यात वर्णन केलं आहे, त्याला आजच्या भाषेत 'मर्क्युरी वोर्टेक्स इंजिन' म्हणतात. गंमत म्हणजे, नासा ने हेच मर्क्युरी वोर्टेस इंजिन, त्यांच्या १९५० च्या दशकापासून ते १९७० च्या दशकापर्यंतच्या रॉकेट्स मध्ये आणि विमानांमध्ये वापरले.

(असं म्हणतात की, जून १८९५ मध्ये, शिवकर बापूजी तळपदे यांनी मुंबई चौपाटीवर जे विमानोड्डाण करून दाखवले, ते याच मर्क्युरी वोर्टेक्स ऑइल इंजिन वर आधारित होते. हे 'मरुतसखा' विमान, आकाशात १,५०० फूट उंच उडून मग खाली आले. याच्या तब्बल आठ वर्षांनंतर, राईट बंधूंनी जे विमान उडवून दाखवलं ते फक्त १२० फूट उडालं होतं.)

भोज राजा इथेही थांबत नाहीत, तर पुढे ते चक्क यंत्रमानवाचे वर्णन करतात, ज्याला आपण 'रोबो' म्हणतो. भोज राजांच्या भाषेत ते आहेत, 'स्त्री-पुरुष प्रतिमा यंत्र'. या ३१ व्या यंत्रविधानम् अध्यायात, १०१ ते १०८ श्लोक हे अशा स्त्री-पुरुष प्रतिमा यंत्राचे वर्णन करतात.

मुळात ही प्रतिमा यंत्रे, सेवकांची कामे करण्यासाठी केलेली यंत्रे आहेत. मात्र ही कामं करण्यासाठी हात, पाय, नाक, डोळे आणि एकूणच मानवी शरीरयष्टी असलेल्या लाकडी बनावटीच्या, पण चामड्याचे आवरण असलेल्या 'ग्रीवाचलनयंत्राची', म्हणजेच यांत्रिक बाहुल्यांची, संकल्पना मांडली आहे.

या बाहुल्या 'चक्रीय विधीनुसार' (अर्थात, घड्याळं जशी स्प्रिंगवर चालतात, दातं एकमेकात अडकवून चालतात, त्या प्रकारे) हात पसरून स्वागत करतील, नमस्कार करतील, स्वागताची किंवा निरोपाची पानसुपारी देतील, आगांतुकांच्या अंगावर गुलाब जल शिंपडतील, विणा वादन करतील... अशी अनेक नानाविध कामं ती करू शकतील.

पुरुष प्रतिमा यंत्र किंवा यंत्रमानव, हे दरवाज्यावर पहारा करतील आणि अनधिकृत प्रवेश करणाऱ्यांना रोखतील, अशी या कळसुत्री बाहुल्यांची / यंत्रांची रचना होती.

या खेरीस पाण्याच्या व्यवस्थापनासाठी पाण्याचे फवारे उडवण्यासाठी अनेक यंत्रांचे / यंत्रमानवांचे नियोजन केलेले होते.

आज हे यंत्रमानव कुठे आहेत..? या यंत्रमानवांना, किंवा यंत्रांना बनविण्याची विस्तृत विधी या ग्रंथात का दिलेली नाही..? असे प्रश्न मनात येऊ शकतात. हे गृहीत धरून भोज राजांनी याचे उत्तर आधीच दिलेले आहे. ते लिहितात, 'ही सर्व तांत्रिक माहिती, स्वार्थी आणि विकृत मनोवृत्तीच्या लोकांच्या हातात पडून समाजविघातक कृत्ये घडून नयेत, या हेतूने पूर्ण माहिती दिलेली नाही. सांकेतिक माहिती दिलेली आहे. मात्र हे सर्व यंत्र / यंत्रमानव, प्रत्यक्षात तयार करता येतात'.

आपण किती दुर्दैवी आणि दुर्भागी आहोत बघा. आपल्याला हे सर्व अफलातून ज्ञान माहीतच नव्हतं. यंत्रमानव (रोबो) ही संकल्पना पाश्चात्यांची, हे आपल्या डोक्यात घट्ट बसलं होतं. आर्थर सी क्लार्क हे विज्ञान कथांचे जगप्रसिद्ध लेखक. अंतराळ प्रवासासकट अनेक गोष्टींची त्यांनी कल्पना मांडली आणि जगभर ते 'भविष्यात

डोकावणारा, भविष्य बघू शकणारा लेखक' म्हणून प्रसिद्ध झाले.

वादासाठी आपण गृहीत धरू या की, भोज राजांनी यंत्रमानवाचा शोध नाही लावला, कारण आज त्या काळातले एकही यंत्रमानव उपलब्ध नाही. पण भोज राजांनी यंत्रमानवाची अत्यंत सविस्तर आणि मुद्देसूद मांडणी केली आहे. मग आर्थर श्री क्लार्क यांना जसं आपण नावाजतो, त्यांचा उदो-उदो करतो, तितका तरी उल्लेख आपण भोज राजांचा का करू नये? किती कपाळ करंटे आपण..!

'समरांगण सूत्रधार' हा ग्रंथ सापडला तोही अपघातानेच. महामहोपाध्याय टी गणपती शास्त्री (१८६० - १९२६) हे काही जुने संस्कृत ग्रंथ शोधत होते. यापूर्वी त्यांनी त्रिवेंद्रम जवळील गावात, भासांच्या नाटकांची मल्याळम लिपीतली हस्तलिखितं शोधली होती. यानंतरच जगाला नाटककार भासांची ओळख झाली.

शोधता - शोधता टी गणपती शास्त्री बडोद्याला आले. येथे त्यांना समरांगण सूत्रधार ची, भूर्जपत्रावरची पांडूलिपी मिळाली. त्यावरून त्यांनी त्याची नीट प्रत तयार करून, त्यांच्या मृत्यूच्या दोनच वर्षे आधी ती छापली. टी गणपती शास्त्रींनी त्यांच्या मृत्यूपर्यंत जुने संस्कृत ग्रंथ शोधून काढून, लोकांसमोर आणण्याचं मोठं काम केलं आहे. 'भारतानुवर्णनम्' सारखे काही महत्त्वाचे ग्रंथ ही त्यांनी लिहिले आहेत.

दुर्दैवानं, समरांगण सूत्रधार वर अधिकतम संशोधन हे युरोपच्या विद्वानांनी केलंय. एकट्या जर्मनीत या पुस्तकावर किमान सात लोकांनी डॉक्टरेट केलेली आहे. एडम हार्डी आणि फेलिक्स ओटर यांनी या ग्रंथावर बरंच काम केलंय. त्यामुळे जवळजवळ प्रत्येक ठिकाणी, 'समरांगण सूत्रधार' च्या बाबतीत संदर्भ म्हणून त्यांच्याच पुस्तकांची नावं समोर येतात.

भारतात याबाबत फारसं काम झालेलं नाही. साधारण वीस-पंचवीस वर्षांपूर्वी, मध्य प्रदेश लोक निर्माण विभागाचे मुख्य अभियंता चिंतामणी कांड यांनी पुण्याच्या प्रभाकर आपटे यांना समरांगण सूत्रधारचा इंग्रजीत अनुवाद करण्याचा आग्रह केला. स्वतःच्या उतार वयातही आपट्यांनी ते काम अगदी मनोभावे केलं. त्यांच्या या ग्रंथाचे संदर्भ आजकाल पाश्चात्त्य विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात घेतले जातात.

भारतात मात्र माझ्या माहितीप्रमाणे फक्त दोघांचीच पीएचडी या ग्रंथावर आहे.

आपल्याला आपल्याच ज्ञानाची महती माहीत नाही हे आपलं दुर्दैव आहे..!

**- प्रशांत पोळ**
ज्येष्ठ लेखक
मुंबई

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# बहुरत्ना वसुन्धरा

*प्रस्तुत लेखात नीला कोर्डे यांनी पृथ्वीमातेबद्दल वाचकांना सखोल माहिती विशद केली आहे. - संपादक*

**समुद्रवसने देवि पर्वतस्तनमण्डले ।**
**विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्श क्षमस्व मे ।।**

या श्लोकात जिला वंदन करून पादस्पर्शासाठी जिची क्षमा मागितली आहे ती विष्णुपत्नी आहे आपली पृथ्वी:- उत्तुंग पर्वत आणि अथांग समुद्र यांनी युक्त असलेली.

आज आपण पृथ्वीच्या म्हणजेच वसुंधरेच्या पर्यावरणाच्या संरक्षणासाठी २२ एप्रिलला 'जागतिक वसुंधरा दिन' साजरा करतो.

पंचमहाभूतांपैकी पृथ्वी हे स्थूलतम तत्त्व आहे, जिच्यावर सर्व चराचरांचे जीवन अवलंबून आहे. त्या पृथ्वीला आपल्या पूर्वजांनी स्त्रीत्वाचा महन्मंगल आविष्कार असलेल्या मातृरूपात पाहिले आहे. मातेप्रमाणेच ती सर्जनशील आहे. ऋतुप्राप्ती ही मातृत्वाची पूर्वावस्था आहे. पृथ्वीही ऋतुमती म्हणजे सहा ऋतूंनी युक्त आहे. ऋतुप्राप्ती झालेल्या स्त्रीला 'रजस्वला' म्हणतात. पृथ्वीही रजाने म्हणजे धूलिकणांनी युक्त आहे. इतकेच नव्हे तर, मृगाचा पाऊस पडल्यावर दिसणाऱ्या लाल इंद्रगोप किड्यांमुळे ती खरोखरच रजस्वला होते असे मानले आहे.

शब्दसंपन्न संस्कृत भाषेत पृथ्वीसाठी तिची गुणवैशिष्ट्ये सांगणारे अनेक शब्द आहेत. तिच्यातून अनेक उत्कृष्ट सजीव निर्जीवांची निर्मिती होत असल्यामुळे ती 'वसुंधरा, वसुधा, वसुमती' आहे आणि 'वसुदा म्हणजे उत्कृष्ट वस्तू देणारी'ही आहे. भूतमात्रांना धारण करणारी म्हणून ती 'भूतधात्री धारिणी' आहे. तिच्यातील संसाधने (resources) मिळविताना तिला त्रास झाला तरी ती तो सहन करते म्हणून 'सर्वंसहा' आहे आणि मातेप्रमाणे सहनशील असल्यामुळे 'क्षमा'ही आहे. या व्यतिरिक्त तिला 'उर्वी, अवनी, मेदिनी, रसा' अशी अन्य नावेही आहेत.

पृथ्वीवरील जमिनीवर आपले जीवन अवलंबून असल्यामुळे पृथ्वी आणि जमीन यांना 'भूमी, मही, क्षिती, धरणी' यांसारखे समान शब्द संस्कृत भाषेत आहेत.

याहीपेक्षा विशेष उल्लेखनीय म्हणजे, वृक्षांचे जमिनीशी म्हणजेच पृथ्वीची घट्ट नाते असल्यामुळे वृक्षाला संस्कृतमध्ये 'भूमीरूह, भूरूह, भूज, महीरूह, महीज, पृथ्वीरूह, उर्वीरूह, अवनीरूह' अशी नावे आहेत. याशिवाय वृक्षाला 'वसु' हे नाव असल्यामुळे 'वसुधा' या पृथ्वीच्या नावाचा अर्थ 'वृक्ष धारण करणारी' असाही होतो.

पृथ्वीच्या एका वैशिष्ट्यपूर्ण नावाचा येथे मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. ते म्हणजे 'गो'. संस्कृत मध्ये 'गो' या शब्दाचे 'पृथ्वी, माता आणि गाय' असे तीन अर्थ होतात. विशेष म्हणजे आपल्या पूर्वजांनी पृथ्वीला मातेच्या रूपाप्रमाणे गाईच्या रूपातही पाहिले होते.

आपण ब्रह्मा-विष्णू-महेश या देवत्रयीमध्ये विष्णूला पृथ्वीचा पालनकर्ता मानले आहे म्हणूनच ती विष्णुपत्नी आहे. शेषशायी विष्णूच्या शेष नागाने आपल्या

सहस्र फणांच्या मस्तकावर पृथ्वीला धारण केले आहे असा समज आहे. पृथ्वीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असता स्वत: विष्णूने मत्स्य, कूर्म आणि वरह अवतार धारण करून पृथ्वीचे रक्षण केले.

कृष्णावतारातही विष्णू गोपाल म्हणजे केवळ गाईचा पालनकर्ता नसून 'गो' म्हणजे पृथ्वीचाही पालनकर्ता आहे. 'गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा' असे श्रीकृष्णाने भगवद्‌गीतेच्या पंधराव्या अध्यायात म्हटले आहे. म्हणजेच तो पृथ्वीत शिरून आपल्या शक्तिने सर्व भूतांना धारण करतो. वर्षाऋतूत मेघांतून पडणाऱ्या पावसाने आकाशाचे पृथ्वीशी मीलन होते. म्हणूनच कृष्णावतारातील विष्णूसुद्धा मेघश्याम, घनश्याम आहे.

संस्कृत साहित्यात वेदवाङ्मयापासून ते अभिजात संस्कृत साहित्यापर्यंत पृथ्वीप्रेमाचा आविष्कार झाला आहे. अथर्ववेदाच्या १२ व्या काण्डात 'पृथिवी पालुपद सूक्त' नावाचे सूक्त आहे. या सूक्तात 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना आली आहे.

**अथर्वन् ऋषी म्हणतात –**

**जनं बिभ्रतो बहुधा विवाचसं नानाधर्माणं पृथिवी यथौकसम्।**
**सहस्र धारा द्रविणस्य मे दुहां ध्रुवेव धेनुरनपस्फुरन्ती।।**

*अथर्व वेद काण्ड १२ सूक्त १ मंत्र क्र. ४५*

अर्थ – नानाविध धर्मीय आणि नाना भाषिक लोकांना गृहसदृश एकोप्याने सामावून घेणारा ही अविरोधी स्थिर पृथ्वीदेवी धेनुसदृश सहस्रधारांनी आम्हाला ऐश्वर्य प्रदान करो.

येथेही पृथ्वीला धेनूची उपमा दिली आहे. पृथ्वीचे वसुंधरा हे नाव सार्थ करणाऱ्या पृथ्वीवरील संपत्तीचा उल्लेखही पुढील मंत्रात आला आहे.

**निधिं बिभ्रती बहुधा गुहा वसु मणिं हिरण्यं पृथिवी ददातु मे।**

**वसूनि नो वसुदा रासमाना देवी दधातु सुमनस्यमाता।।**

*अथर्ववेद काण्ड १२ सूक्त १ मंत्र क्र. ४४*

अर्थ – अनेकविध गुप्त साठे धारण करणारी ही देवतास्वरूप धनदायिनी आणि उदार पृथ्वीदेवी आम्हाला सुखाने धन, रत्ने, सुवर्ण प्रदान करो.

आज ज्यांचे पृथ्वीवरील अस्तित्वच धोक्यात आले आहे त्या वृक्ष-वनस्पतींचा उल्लेख करायला अथर्वन् ऋषी विसरलेले नाहीत. ते म्हणतात –

**यस्या वृक्षा वानस्पत्या ध्रुवास्तिष्ठन्ति विश्वहा।**
**पृथिवीं विश्वधायसं धृतामच्छावदामसि।।**

*अथर्ववेद काण्ड १२ सूक्त १ मंत्र क्र. २७*

अर्थ – स्थिर वनस्पती आणि वृक्षांनी युक्त अशा सर्वगुणसंपन्न आणि सुरक्षित भूमिदेवीचे आम्ही स्तवन करतो.

पृथ्वीप्रेम व्यक्त करणारे अथर्ववेदाच्या १२ व्या काण्डातील ६३ मंत्रांचे हे 'पृथिवी पालुपद सूक्त' मुळातूनच वाचण्यासारखे आहे.

अभिजात संस्कृत साहित्यात रामायण या आर्ष म्हणजे वाल्मीकी ऋषींनी रचलेल्या काव्याची नायिका सीता 'भूमिकन्या' आहे. केवळ लक्ष्यार्थाने नव्हे, तर वाच्यार्थाने पृथ्वी तिला मायेने आपल्या कुशीत नव्हे, तर उदरात घेणारी तिची माता झाली आहे.

कविकुलगुरू कालिदासाच्या काव्यकृतींमध्ये त्याचे पृथ्वीप्रेम व्यक्त झाले आहे. त्याच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकाच्या पहिल्या अंकात कौशिकी नामक परिव्राजिकेने विदिशाधीश अग्निमित्राला दिलेला आशीर्वाद अर्थपूर्ण आहे. कौशिकी म्हणते –

**महासारप्रसवयो: सदृशक्षमयोर्द्वयो:।**
**धारिणीभूतधारिण्यांर्भव भर्ता शरच्छातम्।।**

***मालविकाग्निमित्रम् अंक १ श्लोक क्र. १५***

अर्थ – शेकडो शरद ऋतुंमध्ये महातेजस्वींना निर्माण करणारी, भूतमात्रांना धारण करणारी क्षमाशील पृथ्वी आणि धारिणी राणी, जी तेजस्वी अपत्यांना जन्म देणारी आणि क्षमाशील आहे अशा दोघींचे तुम्ही शंभर शरद ऋतूंपर्यंत स्वामी व्हा.

येथे अग्निमित्राला 'जीवेत् शरद: शतम्' हा आशीर्वाद देताना त्याची पत्नी धारिणी आणि भूतधारिणी यांचा जोडलेला संबंध अर्थपूर्ण आहे. राजा हा विष्णुरूप मानला गेल्यामुळे तो केवळ धारिणी नामक राणीचाच नव्हे तर भूतमात्रांना धारण करणाऱ्या पृथ्वीचाही पती आहे. कालिदासाने योजिलेले 'सदृशक्षमा' हे विशेषण, 'पृथ्वीप्रमाणेच धारिणी राणीही क्षमाशील आहे' असे सूचित करणारे आहे.

कालिदासाने आपल्या 'रघुवंशम्' या महाकाव्यात गाईला पृथ्वीच्या रूपात पाहिले आहे. रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गात वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात कामधेनू सुरभीची कन्या नन्दिनी हिची सेवा करणाऱ्या दिलीप राजाचे वर्णन आले आहे. कालिदास म्हणतो –

**निवर्त्य राजा दयितां दयालुस्तां सौरभेयीं सुरभिर्यशोभि:।**
**पयोधरीभूत चतु:समुद्रां जुगोप गोरूपधरामिवोर्वीम्।।**

***रघुवंशम् सर्गर श्लोक क्र. ३***

अर्थ – त्या दयाळू आणि यशाने शोभून दिसणाऱ्या राजाने पत्नीला आश्रमाकडे परत पाठविले. त्याने जणू चार समुद्ररूपी आचळे असणाऱ्या सुरभीकन्या नन्दिनीच्या रूपाने चार समुद्रांनी युक्त पृथ्वीचेच रक्षण केले.

येथे तर कालिदासाने पृथ्वीची एकरूपता कामधेनू कन्येशी दाखविली आहे. कामधेनूकन्येतही कामधेनूप्रमाणेच इच्छा पूर्ण करण्याची क्षमता आहे. पृथ्वीसुद्धा आपल्याला सर्व इच्छित वस्तू देणारी आहे. पृथ्वीचे रक्षण करावे त्याप्रमाणे राजा दिलीप गाईचे रक्षण करीत होता. या श्लोकातील 'पयोधरीभूत' हा शब्द द्वर्थी आहे. 'पयस्' या संस्कृत शब्दाचे 'जल व दूध' असे दोन अर्थ होतात. पृथ्वी जलाने भरलेल्या चार समुद्रांनी वेढलेली आहे, तर नन्दिनीची चार आचळे दुधाने भरलेली आहेत.

नन्दिनीच्या कृपाप्रसादाने गर्भवती झालेल्या राणी सुदक्षिणेला मृत्तिकाभक्षणाचे डोहाळे लागले. मृत्तिका हा पृथ्वीचा अविभाज्य घटक असल्यामुळे सुदक्षिणेला होणारा पुत्र पृथ्वीपती होणार असल्याचेही येथे सूचित झाले आहे.

कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुन्तलम्' या विश्वविख्यात नाटकात बीज धारण करणाऱ्या पृथ्वीच्या सर्जनशीलतेचा उल्लेख आपल्याला पाहावयास मिळतो. गर्भवती शकुन्तलेचा त्याग केल्यानंतर पश्चात्तापदग्ध झालेला दुष्यन्त म्हणतो –

**संरोपितेऽप्यात्मनि धर्मपत्नी**
**त्यक्ता मया नाम कुलप्रतिष्ठा।**
**काल्पिष्यमाणा महते फलाय**
**वसुंधरा काल इवोप्तबीजा ।।**

***अभिज्ञानशाकुन्तलम् अंक ६ श्लोक क्र. २४***

अर्थ – अगदी वेळेवर बी पेरल्यामुळे जिच्यात उत्कृष्ट पीक तरारण्याची खात्री आहे अशा भूमीचा एखाद्याने त्याग करावा त्याप्रमाणे माझे बीज धर्मपत्नीच्या उदरात असूनसुद्धा मी अविचाराने तिचा त्याग केला.

कालिदासाप्रमाणेच भारवी, माघ, भवभूती यांसारख्या अन्य संस्कृत कवींच्या काव्यांतही पृथ्वीविषयक संदर्भ आले आहेत. विस्तारभयास्तव येथे कवींचा 'मानदण्ड' असलेल्या कालिदासाच्याच काव्यांचा संदर्भ दिला आहे.

संस्कृत शास्त्रीय ग्रंथांमध्येही पृथ्वीविषयक विवेचन आले आहे. अन्नंभट्टाच्या 'तर्कसंग्रह' या ग्रंथात 'तत्र गन्धवती पृथिवी' म्हणजे गन्ध हे पृथ्वीचे व्यवच्छेदक लक्षण असल्याचे सांगितले आहे. पृथ्वीमध्ये रूप, रस, स्पर्श इत्यादी अन्य गुण असले तरी गन्ध मात्र फक्त पृथ्वीमध्येच आहे. वर्षाऋतूत तर पृथ्वीचा मादक मृद्गन्ध प्रकर्षाने जाणवतो.

ज्योतिषशास्त्रात वृषभ, कन्या व मकर या राशी पृथ्वी तत्त्वाच्या मानल्या आहेत.

छंद:शास्त्रात प्रत्येक पदामध्ये सतरा अक्षरे असलेल्या एका वृत्ताचे नावही 'पृथ्वी' आहे.

संस्कृत साहित्यातील पृथ्वीप्रेम मराठी साहित्यातही आपल्याला पाहावयास मिळते. ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायात 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना आली आहे. गीतेच्या १२व्या अध्यायातील स्थिरबुद्धी आणि श्रद्धावान भक्ताचे विवेचन करताना ज्ञानेश्वर म्हणतात–

**हे, विश्वचि माझे घर ।**
**ऐसी मती जयाचि स्थिर ।**
**किंबहुना चराचर ।**
**आपण जाहला ।।**

*ज्ञानेश्वरी अध्याय १२ ओवी क्र. २१३*

वसुंधरेवर प्रेम करणारा तिच्यावरील चराचराशी कसा एकरूप होतो हे सांगताना संत तुकाराम म्हणतात –

**वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें**
**पक्षीही सुस्वरें आळविती**

संत रामदासांनी दासबोधाच्या सोळाव्या दशकातील तिसऱ्या समासात पृथ्वीचे स्तवन केले आहे. 'बहुरत्ना वसुंधरा' हे या स्तवनाचे सार आहे.

ज्या धरित्रीवर आपले जीवन अवलंबून आहे. तिच्याविषयीची कृतज्ञता बहिणाबाई चौधरी यांच्या 'धरत्रीले दंडवत' या कवितेत व्यक्त झाली आहे. त्या म्हणतात –

**अशी धरत्रीची माया**
**अरे तीले नही सीमा**
**दुनियेचे सर्वे पोट**
**तिच्यामधी झाले जमा**

स्वत: शेतात राबणाऱ्या बहिणाबाईंनी धरत्रीची म्हणजे पृथ्वीचीच सर्जनशीलता अगदी जवळून न्याहाळली आहे. 'देव अजब गारोडी' या त्यांच्या कवितेत धरत्रीच्या कुशीमधी निजलेल्या बी–बियाण्यांचे शेत होण्याची प्रक्रिया हळुवारपणे आणि भावविवशतेने वर्णिली आहे.

गन्धवती पृथ्वीच्या परिमलाचे वर्णन करताना 'आला पाऊस' या कवितेत बहिणाबाई म्हणतात –

**आला पह्यला पाऊस शिंपडली भुई सारी**
**धरत्रीचा परिमय माझं मन गेलं भरी**

शेतात काबाडकष्ट करणाऱ्या बहिणाबाई एका अर्थी 'भूमीकन्या'च आहेत.

पृथ्वीकडे म्हणजेच भू–गोलाकडे पाहाण्याचा एक शास्त्रीय दृष्टिकोनही आहे. पृथ्वीच्या अक्षांश–रेखांशाचा उल्लेख जनकवी पी. सावळाराम यांच्या 'धागा धागा अखंड विणू या' या गीतात आला आहे –

**अक्षांशांचे रेखांशांचे उभे आडवे गुंफूनी धागे**
**विविधरंगी वसुंधरेचे वस्त्र विणले पांडुरंगे**

पृथ्वीच्या युगानयुगे फिरण्याचा उल्लेख त्यांनी आपल्या 'देवरूपी होऊ सगळे' या कवितेत केला आहे. ते म्हणतात – ''एकजिवी अणुरेणुची युगेयुगे फिटले धरणी''.

पृथ्वी जशी स्वत:भोवती फिरता फिरता सूर्याभोवती फिरते तशीच स्त्री स्वत: कार्यरत राहून आपली कौटुंबिक कर्तव्ये पार पाडते.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांची 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' या शास्त्रीय सत्याचे काव्यात रूपांतर करणारी 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता नितांत सुंदर आहे.

या कवितेत पृथ्वी सूर्याला म्हणते -

'युगामागूनी चालली ही युगेही, करावी किती भास्करा वंचना, किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी कितीदा करू प्रितीची याचना.

वेदवाङ्मयापासून संस्कृत साहित्यात, तसेच मराठी साहित्यात ज्या बहुरत्ना वसुंधरेविषयी प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली गेली आहे. तिची आज आपण काय अवस्था केली आहे. अपरिहार्य पादस्पर्शासाठीसुद्धा ज्या विष्णुपत्नी पृथ्वीची आपल्या पूर्वजांनी क्षमा मागितली होती तिच्या पर्यावरणाला आज मानवाच्या लोभाने, लालसेने धोका निर्माण झाला आहे. आज पृथ्वीचे हिरण्याक्षासारख्या दानवापासून नव्हे, तर मानवापासून रक्षण करण्याची वेळ आली आहे. ''पृथ्वीकडे सर्वांच्या गरजा भागविण्याइतकी संसाधने आहेत, परंतु एकाचीसुद्धा हाव पुरविण्याइतकी संसाधने नाहीत.'' या महात्मा गांधींच्या विधानाचा आपल्याला विसर पडला आहे.

औद्योगिकीकरणाच्या ध्यासापायी पृथ्वीतून अधिकाधिक संसाधने मिळवताना निसर्गावर केलेल्या आक्रमणाचे दुष्परिणाम आज आपण अनुभवतोच आहोत. या संदर्भात कुसुमाग्रजांच्या 'आगगाडी व जमीन' या कवितेची आठवण होते. ८० वर्षांपूर्वी क्रांतीचे दर्शन घडविणारी ही कविता आजच्या औद्योगिकीकरणाच्या काळात एक नवाच संदर्भ घेऊन आली आहे. जमिनीवरून सुसाट वेगाने धावत तिला चिरडून टाकू पाहाणारी ही आगीनगाडी आता विजेवर धावणारी झाली आहे. आज तर ती अधिकच वेगाने जमिनीला म्हणजे पृथ्वीला पादाक्रांत करीत आहे. सुसाट वेगाने धावणारी आगगाडी शेवटी ज्या दरीत कोसळते ती दरीसुद्धा निसर्गाचेच प्रतीक आहे. आज निसर्ग आणि मानव यांच्यामध्ये जणू एक 'दुराव्याची दरी'च निर्माण झाली आहे. 'औद्योगिकीकरण हे पर्यावरणपूरक असले पाहिजे' हा एक नवाच संदेश आज आपल्याला या कवितेतून मिळतो. कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेतील पृथ्वीसुद्धा आज प्रदूषणाने ग्रासलेली आहे. आज तिला तेजोनिधी भास्कराच्या 'लाल ओठातली आग' फक्त प्यावीशी वाटते. म्हणजेच ती त्याच्याकडे प्रीतीची नव्हे, तर तिच्यापासून हिरावल्या गेलेल्या निर्मितीक्षम ऊर्जेची याचना करीत आहे.

आजच्या वृक्षहानीच्या संदर्भात सुद्धा "Greed destroyed the green" असे म्हणावेसे वाटते. म्हणूनच "Go green to save the blue" हा आपला आजचा मूलमंत्र असला पाहिजे. आजच्या जागतिक तापमानवाढीचा (Global warming) सागरांवरही परिणाम होऊन विष्णुपत्नी पृथ्वीचे समुद्रवसनही विरू लागले आहे. तेव्हा ही 'Global warning समजून पृथ्वीच्या, वसुंधरेच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची आपण प्रतिज्ञा करू या.

**– नीला कोर्डे**
निवृत्त संस्कृत विभाग प्रमुख
रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय,
घाटकोपर, मुंबई
वरदान, ४था मजला, ए-६६, एदलजी रोड,
टेंभी नाका, ठाणे (प) ४०० ६०१
भ्रमणध्वनी : ९३२४८९१८८०

●●●

# 'A La Carte अलास्का!'

*मे २०२४ मध्ये पृथ्वीवरील नंदनवन 'अलास्का' प्रदेशाची सफर केली. ही सहल आयोजित करण्यापासून, ते सहल पूर्ण होईपर्यंत खूप आनंद मिळाला. तो सर्वांबरोबर वाटून द्विगुणित करावा अस वाटलं, म्हणून हा लेखप्रपंच. 'A La Carte अलास्का!' या लेखमालेचा हा तिसरा लेख. – संपादक*

## आल्हाददायक बंदर : सुवर्ड

आमच्या सहलीच्या तिसऱ्या दिवशी आम्ही बसने अँकरेज वरून सुवर्डला जाणार होतो. सकाळी पावणे सात वाजता आम्ही बस डेपो जवळ पोहोचलो. निसर्ग सौंदर्याचा आनंद घेता यावा म्हणून मोठ्या काचा असलेली बस होती. बस मध्येच प्रसाधनगृहाचीही सोय होती. बस चालू झाल्यावर आजूबाजूची माहिती देणाऱ्या उद्‌घोषणा सुरू झाल्या.

आजचा मौसम काही वेगळाच होता. आभाळ भरून आले होते. थोडे पुढे गेल्यावर बर्फवृष्टी सुरू झाली. बोचरी थंडी, एका बाजूला निळाशार समुद्र, दुसरीकडे बर्फांनी आच्छादलेली झाडे व डोंगर आणि पडणारे पांढरे शुभ्र हिम... हा नजारा शब्दातीत होता. मी नंदनवनात आहे की काय असा मला भास झाला; आणि या सुंदर क्षणांसाठी मी परमेश्वराचे मनोमन आभार मानले. अँकरेज ते सुवर्ड हा रस्ता नयनरम्य दृश्यांसाठी सुप्रसिद्ध आहे. पुढील प्रकरणात त्याबद्दल सविस्तर लिहिनच!

अलास्का वाइल्डलाईफ कन्सर्वेशन सेंटर, बेलुगा पॉईंट अशा काही ठिकाणांना भेट द्यायचा खरंतर बेत होता; पण खूप बर्फवृष्टी होत असल्यामुळे तो रहित करावा लागला. मे महिन्यात येथे एवढी बर्फवृष्टी होत नाही. स्थानिक अलाकन्स आता थंडी आणि बर्फवृष्टीला कंटाळले होते आणि स्वच्छ सूर्यप्रकाशाची वाट बघत होते. आम्ही मात्र या हिमवृष्टीचा मनमुराद आनंद लुटत होतो.

साधारण अडीच–तीन तासांच्या प्रवासानंतर आम्ही सुवर्डला पोहोचलो. हिमनद्या, हिमाच्छादित केनाइ पर्वत रांगा व अथांग सागराच्या कुशीत वसलेली पारंपरिक alutiq लोकांची ही भूमी. साधारण अडीच–तीन हजार लोकवस्तीचे हे शहर Kenai Fjords नॅशनल पार्क, एक्झिट ग्लेशियर, रेसरेक्शन बे अशा नयनरम्य ठिकाणांसाठी आणि विविध उपक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. हॉटेल रूम तीन वाजता मिळणार होती; त्यामुळे सुवर्डचे प्रसिद्ध मत्स्यालय 'अलास्का सी लाइफ सेंटर' कडे जायला निघालो.

'रेसरेक्शन बे' च्या किनाऱ्यालगत, १९९८ मध्ये बांधलेली ही वास्तू केवळ मत्स्यालय नव्हे. समुद्रात सापडलेल्या जखमी प्राण्यांचे पुनर्वसन, संवर्धन, सागरी जीवांवरील संशोधन आणि यांबद्दलचे प्रशिक्षण या सर्व बाबींचे व्यवस्थापन या संस्थेमार्फत केले जाते. ना नफा तत्त्वावर चालवण्यात येणारी आणि ही सर्व कार्ये पुरवणारी ही जगातील अशी एकमेव संस्था आहे. अलास्का फेअरबँक्स विद्यापीठ आणि सागरी किनाऱ्याशी संबंधित इतर अनेक संशोधन केंद्रांबरोबर संलग्नपणे ती काम करते. इमारतीत तळमजला व पहिल्या मजल्यावर हे मत्स्यालय आहे.

सागरी सस्तन प्राणी, सागरी पक्षी, विविध प्रकारच्या माशांच्या प्रजाती, व समुद्री अपृष्ठवंशी प्राणी अशा वेगवेगळ्या दालनांमध्ये हे प्राणी, त्यांची तपशीलवार माहिती, त्यांच्या संवर्धनासाठी केले जाणारे प्रयत्न इत्यादी सविस्तरपणे मांडले आहे. खास करून मुलांना काही

प्राण्यांना संस्थेच्या कर्मचारी वर्गासमोर हाताळता देखील येते. मुलांच्या मनातील प्राण्यांबद्दलचे कुतूहल जागे व्हावे, त्यांना सागरी जीवनाबद्दल आपुलकी वाटावी म्हणून चालणारे हे अव्याहत प्रयत्न खरोखर वाखाणण्याजोगे आहेत. शिवाय काही मिनिटांचे त्यांचे प्राण्यांसोबतचे विशेष प्रशिक्षण वर्ग देखील आयोजित केले जातात.

आपण मत्स्यालयात प्रवेश करताच एक जहाज आपले स्वागत करते. मुले या जहाजात बसून खूप खेळतात, फोटो काढतात. मुलांना दर्यात खोलवर जाण्यासाठी घातले जाणारे सुरक्षा जॅकेट घालून अनुभवता देखील येते. मुलांचे कुतूहल शमवण्यासाठी केले जाणारे विविध प्रयोग बघून आपण थक्क होतो.

मत्स्यालयाच्या पहिल्या मजल्यावरून अतिशय मनोरम देखावा दिसतो. पार्श्वभूमीवर दूरवर दिसणारे बर्फाच्छादित डोंगर, रेसरेक्शन खाडी, निळे आकाश, आणि लॉवेल क्रीक धबधबा. निसर्गाने मुक्तहस्ताने केलेली ही सौंदर्याची उधळण कितीही बघितली तरी मन तृप्त होत नाही. लॉवेल क्रीक् वॉटर फॉल हा तीस फुटांवरून खाली कोसळणारा मानवनिर्मित जलप्रपात. नैसर्गिक नसला तरी हा धबधबा व आजूबाजूचा परिसर आपल्याला भुरळ घालतो हे मात्र खरं!

साधारण दोन तास मत्स्यालयात फिरून झाल्यावर भूक स्वस्थ बसू देईना. मत्स्यालयासमोरच 'गोल्ड रश बिस्ट्रो' या रेस्टॉरंट मध्ये उत्तम व्हेज बर्गरचा आस्वाद घेतला. क्षुधाशांती करून हॉटेलवर आलो. जरा वेळ आराम केला.

आता थोडं हॉटेल विषयी! आम्ही सुवर्डला 'हार्बर थ्रीसिक्सटी' हॉटेलमध्ये दोन दिवस होतो. सुवर्ड हे बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. या बंदराला लागूनच हे हॉटेल आहे. शिवाय रेल्वे स्टेशन पासूनही ते अगदी जवळ आहे. हॉटेल रूममधून दिसणारे निसर्ग सौंदर्य ही या हॉटेलची खासियतच म्हणावी लागेल. रूमच्या मोठ्या खिडकीतून समोर बघितलं की, नांगरलेल्या बोटी व क्रूजेस दिसत. काही क्रूजेससाठी हॉटेलमधूनच आत जाण्याची व्यवस्था होती. लक्ष देऊन बघितलं की, समुद्राच्या पाण्यात बुडी मारणारे जलचर दिसत. लांबवर नजर टाकली की, निळंशार आकाश, हिमाच्छादित पर्वत रांगा व अथांग समुद्र दृष्टीस पडे. अन् सायंकाळी या पार्श्वभूमीवर मनमोहक इंद्रधनुष्याची कमान. 'सुख म्हणजे नक्की काय असतं?' या प्रश्नाचं हे चित्र म्हणजे निसर्गदेवतेने दिलेलं उत्तर असावं बहुतेक!

'हार्बर थ्रीसिक्सटी' हॉटेलमधील आणखी एका गोष्टीने अलास्कन्सच्या निसर्गप्रेमाची पुनःप्रचिती दिली. दररोज सायंकाळी प्रमुख प्रवेशद्वारा जवळील फलकावर त्या दिवशी क्रूज सफरीत दिसलेल्या वन्यजीवांची नावे लिहिली जातात. ज्यांनी त्या दिवशी सफर केली आहे, ते हे प्राणी आपल्याला दिसले का हे ताडून बघू शकतात; आणि दुसऱ्या दिवशी जे सफर करणार असतील त्यांची उत्सुकता चाळवली जाते.



**Hotel Harbour 360**

सायंकाळी अजून एका भन्नाट उपक्रमात आम्ही सहभागी झालो. हा उपक्रम म्हणजे 'डॉग स्लेडींग'. अलास्कन हस्की जातीचे कुत्रे विशेष देखभाल करून वाढवले जातात. टोकाची सहनशक्ती, धावण्याचा अतीव वेग, खिलाडू वृत्ती व अलास्कन तापमानाशी जुळवून घेण्याची क्षमता यासाठी हे कुत्रे सुप्रसिद्ध आहेत.

दरवर्षी मार्च महिन्यात अँकरेज शहरापासून नोम

शहरापर्यंत एक खास शर्यत आयोजित करण्यात येते 'IditarodTrail Sled DogRace' म्हणून ती जगप्रसिद्ध आहे. तिला मोठा रंजक इतिहास देखील आहे. १९२५ साली नोम शहरामध्ये घटसर्पाची जीवघेणी साथ पसरली. कडाक्याच्या थंडीत लस पोहोचवणे अशक्य होते. अशावेळी अलास्कन हस्कीजच्या मदतीने गाडी ओढून ही लस नोमपर्यंत पोहोचवली गेली; आणि अनेक मुलांचे प्राण वाचले. या घटनेच्या स्मरणार्थ, अलास्कन हस्कीजना मानवंदना देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. अलास्काच्या इतिहासात दळणवळणामध्ये अलास्कन हस्कीजनी मोलाची भूमिका बजावली आहे.

'IditarodTrail Sled DogRace' या स्पर्धेमध्ये १२ ते १६ कुत्र्यांचा एक संघ असतो. मार्चमध्ये कडाक्याच्या हाडे गोठवणाऱ्या थंडीत स्पर्धेत सहभागी संघ बर्फातून गाडी ओढत ठरवलेले अंतर कापतात. जो संघ प्रथम पोहोचतो तो अर्थातच विजयी होतो. ही शर्यत जिंकणे ही अतिशय प्रतिष्ठेची बाब मानली जाते. यासाठी विशिष्ट प्रजातीच्या कुत्र्यांना विशिष्ट आहार, व्यायाम दिला जातो. त्यांची देखरेख केली जाते. यासाठी खास प्रशिक्षक असतात. स्पर्धेच्या वेळी खास चालक त्यांच्याबरोबर असतो. या कुत्र्यांचा फिटनेस, त्यांची चालकाबरोबरची दोस्ती या सगळ्यांना खूप महत्त्व असते. ही स्पर्धा अनुभवण्यासाठी जगभरातून लाखो प्रेक्षक मार्चमध्ये येथे येतात.

Seward वरून Resurrection Mountain आणि Box Canyon Creek यांच्यामध्ये असलेल्या जंगलात आम्ही कारने पोहोचलो. शर्यतीत जरी हे कुत्रे बर्फामधून धावत असले तरी आम्ही मात्र त्यांनी ओढलेल्या गाडीतून आजूबाजूच्या जंगलात फेरफटका मारला. एरवी मी प्राण्यांनी ओढलेल्या गाडीत बसायला नाखुश असते. प्राण्यांना आपल्यासाठी का त्रास द्यायचा असं मला वाटतं. पण येथील कुत्रे बाहेर सोडल्यावर गाडी ओढण्यासाठी अक्षरशः नाचत होते. भुंकून भुंकून सर्वांना बेजार करून सोडत होते. पण गाडी ओढायला लागल्यावर मात्र क्षणार्धात शांत झाले. डॉग स्लेडींग झाल्यावर आम्ही त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्यावर माया केली. त्यावेळी जाणवलेला त्यांच्या डोळ्यांतील आनंद मी विसरू शकत नाही. एक अतिशय वेगळा अनुभव मनात साठवून आम्ही हॉटेलवर परतलो. डॉग स्लेडींग करून परत येताना दूर झाडीमध्ये आम्हाला दोन मूस दिसले आणि आमचा आनंद द्विगुणीत झाला!



**Dog sledding**

टूर गाईडकडून सुवर्ड मधल्या आणखी एका मनोरंजक उपक्रमाबद्दल माहिती मिळाली. दरवर्षी चार जुलैला अमेरिकेचा स्वातंत्र्य दिन येथे मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो. इतर अनेक कार्यक्रमांबरोबरच या दिवसाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'माउंट मॅरेथॉन रेस'. तीन मैल अंतर व तीन हजार बावीस फूट उंची कापण्याची ही शर्यत जगातील अतिशय कठीण, लहान अंतराची, पर्वतीय शर्यत आहे. अनेक लोक चार जुलैला शर्यतीत भाग घेण्यासाठी अथवा या घटनेचे साक्षीदार होण्यासाठी सुवर्डला येतात. गेल्या वर्षीच्या विजेत्याने केवळ चव्वेचाळीस मिनिटे व एक्कावन्न सेकंदात हे अंतर पार केले हे ऐकून आम्ही चकित झालो.

**– डॉ. जयश्री पवार**
सहाय्यक प्राध्यापिका,
जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग,
बा.ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे

# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**The Milk Miracle -**

Water is Soul but Camel milk is life

A Somali Saying.

Camel milk is Hazardous to human health. Rajasthan High Court Judgement.

एल्सचे संशोधन असे निश्चितपणे दाखवत होते की, रायकांची आर्थिक परिस्थिती ही त्यांच्याकडे मादी उंट किती आहेत व किती प्रमाणात त्या नवीन पाडसांना जन्म देऊ शकत होत्या यावर अवलंबून होती.

रुपारामने त्याच्या डायरीत खालील नोंद केलेली असते.

एका रायकाच्या मते, या शतकाच्या सुरवातीला अंजी-की-धानी मध्ये १०००० उंट होते. चाळीस वर्षांपूर्वी पाच हजार होते व आत फक्त हजार आहेत. पूर्वी एखादा उंट हरवला तरी कोणी शोधायच्या भानगडीत पडत नसे. हणवंत व रुपारामने पाली जिल्ह्याच्या दक्षिण भागात उंटांच्या कळपांचे सर्वेक्षण करून हा प्रचलित कल निश्चित केला. त्यांनी मुलाखत घेतलेल्या १७४ कुटुंबापैकी ८०% लोकांनी सांगितले की, वीस वर्षांपूर्वीपेक्षा आत त्यांच्याकडे कमी उंट होते.

रायकांच्या मते ही परिस्थिती निर्माण झाली होती उंटांना खायला पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे. ती रोगांचे, आजारांचे व गर्भपाताचेही प्रमाण वाढले होते.

रुपारामच्या डायरीत आणखी एक नोंद असते. पूर्वी मादी उंट वयाच्या तिसऱ्या वर्षानंतर गरोदर राहात; आता, चार किंवा पाच वर्षानंतर गरोदर राहतात.

या सर्वांतून असे जाणवत होते की, चराऊ संसाधने किंवा साधनसंपत्तीच्या मानाने त्यावर अवलंबून असलेल्या उंटांची संख्या खूप जास्त होती. आवश्यक अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे त्यांची पुनरुत्पादक क्षमता कमी होत होती. याला उपाय म्हणजे उंटांची संख्या कमी करणे व त्यांना चांगली खाद्य सामुग्री देणे व आरोग्यसेवा देणे. म्हणजे गर्भपात व पिल्लांचा मृत्यू कमी होईल. पण कळपाचा लहान आकार म्हणजे रायकांची डळमळीत आर्थिक परिस्थिती आणखी खालावेल. (अस्थिर) म्हणजे पुष्कर जत्रेत आणखी कमी नर उंट विकता येतील.

एल्सला वाटते की, रायकांनी उंटांच्यापासून मिळणाऱ्या उत्पादनात वाढ करावी व जॉर्डनच्या बदाउनी प्रमाणे रायकांनी उंटांच्या प्रत्येक भागाचा उपयोग करावा. पण त्यांच्यावर अनेक सांस्कृतिक बंधने असतात. म्हाताऱ्या उंटांना कमी करणे किंवा उंटांच्या मांसाचा उपयोग करणे याचा विचार करणेही अशक्य होते. उंटांची लोकर तोकडी व कमी असते. तिच्यापासून धागा तयार करणे शक्य नसते. पण दुधासंबंधी विचार करणे एल्सला शक्य वाटते. आफ्रिकेच्या कोरड्या भागांत (in the horn of Africa) (region of North -frican Continent the countries of Sudan, Eritrea, Ethiopia, Somali Djibouti are known as Horn of Africa) उंटांचा उपयोग दुधासाठीच करतात. या प्रदेशात इतर कुठल्याही प्राण्यापेक्षा उंट जास्त दूध देतात व

जास्त वेळ देतात. गाई, मेंढ्या शेळ्या फक्त पावसाळ्यात दूध देतात. पण उंट कोरड्या दुष्काळातही दूध देतात. सोमाली मध्ये उंटाच्या दुधाला खूप महत्त्व आहे. ते दुधाचा संबंध शक्ती व सहनशक्तीशी जोडतात. तिने या देशात उंटांचं दूध बायकांच्या उद्योगांच्या जाळ्यातर्फे (नेटवर्क) विकले जाते असे ऐकले होते. मौरीटानियामध्ये एक प्रसिद्ध उंटांचे दुग्धालय होते. त्यांनी उंटाच्या दुधापासून अनेक उत्पादने तयार केली होती त्यांत 'कॅमल बर्ट' नावाचे चीज होते. तसेच, इस्रायलमध्ये एका शास्त्रज्ञाने अनेक प्रकारची आइसक्रीम उंटांच्या दुधापासून तयार केली. तसेच, त्यांत गाईच्या दुधापेक्षा कितीतरी जास्त 'C' व्हिटॅमीन आहे हे सिद्ध झाले आहे. तिने राजस्थानमध्येही असे ऐकले होते की, उंटांचे दूध टायफॉईड व इतर अनेक रोगांवरही संरक्षण असते.

रायकांची मजबूत शरीरयष्टी व न दमता सतत चालणे हे त्याचे जिवंत उदाहरण होते. उंटांचे दूध रायका व त्यांच्या कुटुंबीयांकडून आवडीने प्यायले जाते. ते अतिशय चांगले पौष्टिक व उत्साहवर्धक असते. स्थलांतर करीत असताना उंटाचे दूध हे त्याच्या जेवणातील मुख्य पदार्थ असे. आलेल्या पाहुण्याला उंटांचे दूध ताजे किंवा त्याचा चहा देणे हा त्यांच्या आदरातिथ्याचा एक भाग असे. पण उंटाचे दूध विकणे निषिद्ध मानले होते. स्वतः पाबुजी व महादेवाने बंदी घातली होती. 'उंटांचे दूध विकणे म्हणजे स्वतःची मुले विकणे' अशी म्हण प्रचलित होती व त्यांची अशी समजूत होती की, ज्यांनी उंटांचे दूध विकण्याचा प्रयत्न केला त्याचे सर्व उंट मेले किंवा त्यांच्यावर दैवाचा कोप झाला!

पण १९९४ पासून परिस्थिती बदलू लागली होती. एका उष्ण व दमट संध्याकाळी रुपाराम त्याच्या शोध मोहिमेवरून परतला. त्याचा उत्साह ओसंडून जात होता. त्याने मॅडमला सांगितले की, 'उदयपूर व चितोडगड व आणखी काही ठिकाणी उंटांच्या दूधाचे मार्केट आहे व त्याचे काही नातेवाईक मेवाडमध्ये दूध विकून खूप नफा मिळवतात!'

एल्सचा तिच्या कानावर विश्वास बसेना. पण लगेचच एका दिवसात त्यांच्या भरवशाच्या अँबेसिडरमध्ये ती, हणमंत व रुपाराम स्वतःच्या डोळ्यांनी बघण्यासाठी मेवाडच्या प्रवासास निघतात.

ते रबारियन-की-धानीला आधी जातात. तेथे एक फॅमिली २५ वर्षांपासून गरिबीवर उपाय म्हणून उंटांचे दूध विकायला सुरवात करते. वडिलांनी सात उंटांचे दूध रु. १.५ याप्रमाणे विकायला सुरवात केली. नंतर त्याच्या मुलाने ऐंशी उंटांचे रोज ३० ते ४० kg. दूध रोज विकायला सुरवात केली. उदयपूर व चितोडगडला उंटाच्या दूधाचे मार्केट वाढले. तिथे जवळपास २० उंटांच्या दूधाचे विक्रेते होते. ते ५० ते ७० लि. दूध रोज चहाच्या स्टॉलवर विकत असत. इतर दूधाबरोबर ते मिसळत असत. त्यामुळे चहा पिणाऱ्याला कधीच कळत नसे की, त्यांच्या चहात उंटाचे दूधही आहे. एक बाबुताराम नावाचा रायका, ज्याने पिवळा फेटा घातलेला असतो, जो मेवाडमध्ये लोकप्रिय रंग असतो, त्याला दूधाच्या धंद्यातल्या विक्रीच्या अनेक युक्त्या व बारकावे माहीत असतात. तो व हणमंत त्यांच्या गप्पांमध्ये इतके मग्न होतात की ते तिला भाषांतर करून सांगण्याची तसदी घेत नाहीत. त्याचे प्रवचन पुरे झाल्यावर हणमंत तिला सांगतो की, उंटांच्या दूधाचे मुख्य सेंटर जावरा नावाच्या गावात, मध्यप्रदेशमध्ये आहे. तसेच इंदौर, भोपाळ, रत्लाम येथेही उंटांचे दूध विकले जाते. अनेक रबारींनी चितोडगडहून त्यांचे उंटांचे कळप घेऊन दूध विकण्यासाठी तिकडे स्थलांतर केले आहे व त्याने सांगितले की, 'तुम्ही जावराचे उंटांचे मार्केट बघायला जरूर जा.'

मावळ मधील मावळी नावाचे उंट भरपूर दूध देतात. मेवाड मधील अनेक रबारी त्यांना विकत घेतात. मावळला जायला खूप वेळ लागणार असतो. तेथले रस्ते अतिशय खराब होते. व तेथील रस्त्यांवर राहण्यासाठीही जागा कमी होत्या.

ते एप्रिलच्या मध्यांत मावळची ट्रीप करतात. खरे म्हणजे एल्स नुकतीच टायफॉईडच्या आजारातून उठलेली असते. तिला पूर्ववत शक्ती आलेली नसते. मसालेदार व तुपकट राजस्थानी जेवण तिला पचत नाही. पण यानंतर आणखी गरमी वाढली असती व पावसाळ्यात आणखी रस्ते खराब असतात म्हणून ते अँबेसिडर मधून प्रवासाला निघतात. पुढच्या सीटवर रुपाराम, हणमंत व तिच्या मुलांचा पेट स्नोई त्या दोघांच्या मध्ये बसतो. मागे ती अनेक दुपट्टे डोक्याभोवती गुंडाळून पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे व फळे घेऊन निघते. ती मागच्या सीटवर सुस्तपणे पहुडते. रात्री चितोडगडला ते टुरिस्ट बंगलोत थांबतात.

पुढच्या प्रवासात तिला उन्हाचा खूप त्रास होतो. रुपाराम व हणमंत गप्पा मारण्यात गुंग असतात. स्नोईही त्याच्या लांब पांढऱ्या केसांतही मजेत असतो. कोणीही तिची दखल घेत नाही व त्यांच्या गप्पात तिला सामील करून घेत नाहीत. तिला ते औपचारिकपणे 'मॅडम' म्हणूनच संबोधतात. तिला एकटे पडल्यासारखे वाटते व या हाडे खिळखिळी करणाऱ्या खड्ड्यांतून व रणरणत्या उन्हात प्रवासास आल्याचा पश्चात्ताप होतो. जावराला आल्यावर ते उंटांच्या दुधाच्या विक्रेत्यांना शोधून काढतात. ते एका मिठाईच्या दुकानाकडे निघतात. तेथे त्यांना मेवाडहून आलेला रबारी भेटतो. त्याच्या फेट्याचा रंग व बांधण्याच्या पद्धतीवरून ते ओळखतात. त्याला यांचे औषधाचे प्रोजेक्ट माहिती असते. त्यामुळे त्यांना भेटण्याचा त्याला आनंद होतो. तो दुकानाच्या मागच्या बाजूला त्यांना लस्सी प्यायला बोलावतो. स्नोईलाही एका वेगळ्या बशीत चहा मिळतो. तो त्यांना उंटाचे दूध कसे काढले जाते व ते कसे मार्केट केले जाते हे दाखविण्यास तयार असतो. पण त्यावेळी उंट चरायला बाहेर गेलेले असतात. ते संध्याकाळी परत येणार असतात. तोपर्यंत तो त्यांना जावरातील प्रसिद्ध मूर्ती बघायला सांगतो. त्या बघायला पाकिस्तान व इराण मधून खूप यात्रेकरू येतात. म्हणून जावरात एवढे मोठे उंटांच्या दूधाला मोठे मार्केट असते. कारण त्यांना हिंदू रायकांप्रमाणे उंटाच्या दुधाविषयी आक्षेप नसतो. ती एकटीच त्या मूर्ती बघायला जाते.

परत आल्यावर हणमंत तिला सांगतो की, शंकरजी त्यांना सांगतो की, जावरातील २०% दूध हे उंटांचेच असते. गाई, म्हशींचे दूध विकणारे विक्रेते खूप नाराज होते. उंटाचे दूध माणसांना हानीकारक आहे असे म्हणून एक संपही केला. पण जिल्हा अधिकारी, काही डॉक्टर व चीफ ऑफ पोलिस हे उंटांच्या दुधाच्या बाजूने होते.

सूर्य दिसेनासा व्हायला लागतो तेव्हा शंकरजी त्यांना उंटांचा रात्रीचा मुक्काम असतो तिथे घेऊन जातो. ते एक साधेच शेत असते. उंट सूर्यास्तानंतर येतील असे तिला सांगतात. ते गप्पांत रंगतात. त्यांचे दूध रात्रीच काढले जाते.

तिला उंटांचे दूध काढताना फोटो काढायचा होता. तो एक पुरावा राहिला असता की, भारतात उंटांच्या दुधाची विक्री होते. हणमंत तिला आराम करायला सांगतो. तिच्यासाठी ते सॉफ्ट बेड तयार करतात. ती इतकी दमलेली व अशक्त झालेली असते की, तिला पटकन झोप लागते. मध्येच तिला जाग येते तेव्हा तिला उंटांच्या कण्हण्याचा व दुधाच्या कॅनचा आवाज येतो. पण प्रत्येक वेळा ती लगेचच झोपी जाते. मध्येच तिला डायरिआ चालू होतो. पहाटे, पहाटे तिला जाग येते तेव्हा उंटांचे दूध काढले जात होते. पण सर्वांत आश्चर्याची

---

गोष्ट म्हणजे हे उंट गोदवार व मेवाडच्या उंटांपेक्षा खूप वेगळे असतात. ते पांढरे शुभ्र व छोटे असतात.

मालवी उंटांची एक नवीन जात मिळाल्याचे ते प्रकाशित करू शकतात. प्राणी शास्त्रज्ञांना एक नवीन प्रजाती व जीव शास्त्रज्ञांना एक नवीन जात सापडल्याचे सांगता आले असते. नंतर ते दूध कॅन मध्ये भरून मोटर-सायकलवरून नेण्यास तयार असते. येथील रायकाही जास्त सुखवस्तू व त्यामुळे आत्मविश्वास बाळगून असतात. शंकरजींचा मुलगा रोजचा हिशेब सर्व नोंदी ठेवतो, त्यामुळे त्याला महिन्याला व वर्षाला किती फायदा होतो ते समजते. तो सरकारी शाळामास्तरपेक्षा तिप्पट पैसे मिळवतो. २०००० रु महिन्याला. अर्थात त्याला इतरही खूप खर्च असतात. पेट्रोल, औषधे व उंटपाळ जे या उंटांची काळजी घेतात.

पण ही एकच गोष्ट महत्त्वाची नसते. हे उंट एका वेगळ्या बाभळीच्या मिमार (mimmar) झाडावर पोसले जातात. ही बाभळीची झाडे फक्त मध्यप्रदेशातच वाढतात. हे उंट फक्त नैसर्गिक वनस्पतीवर वाढतात. उंटांना त्यांच्या पाडसांपासून कधीच वेगळे करण्यात येत नाही. जेव्हा त्यांची पाडसे रात्री झोपतात तेव्हाच उंटांचे दूध काढले जाते. रायका तरुण नर उंटाना पुष्कर जत्रेत विकून नफा मिळवत.

मेवाडचे राबरी जास्तीत जास्त मालवी मादी उंटाना विकत घ्यायचा प्रयत्न करत. पण त्यांचे नवीन जन्मलेले नर उंट आकाराने छोटे असल्यामुळे पुष्कर जत्रेत त्यांना जास्त पैसे मिळत नसत. म्हणून ते मारवाडचे नर व मालवी मादी असे संकरित प्रजनन करीत. पण यात मालवी जातच नष्ट होण्याचा धोका होता. पण तात्पुरत्या फायद्यापुढे दूरगामी विचार मेवाडच्या संकरन करणाऱ्या रबारीमध्ये नव्हता.

पण एवढे निश्चित की, मालवी उंट ही वेगळी जात होती (breed). एल्सला परत येऊन सर्व नोंदी करायच्या होत्या, मापे घ्यायची होती व मध्यप्रदेशातील रबारींना भेटायचे होते.

जोधपूरला परत जाण्याची वेळ झाली होती. त्यांची ही मोहीम खूपच उपयोगी होती, नवीन माहितीचा व कल्पनांचा खजिनाच हाती आला होता. याचा सतत संघर्षमय जीवन जगणाऱ्या गोदवारच्या रायकांना फायदा झाला असता. या सर्व उत्साहात ती तात्पुरती खूप उत्साहित व जोशात होती. पण एकदा गाडीत बसल्यावर तिला थकवा जाणवू लागला. परत तिचे पोट बिघडले व तिला मधून, मधून गाडी थांबवून झुडपांचा आश्रय घेऊन पोट रिकामे करावे लागत होते. जोधपूरला पोहचे पर्यंत ती निश्चेष्ट पडली. हणमंत व रुपारामने घरी आणून तिला लगेच पंख्याखाली ठेवले, डॉक्टरला बोलावले व तिच्या प्रोफेसरना फोन केला.

तिला परत शक्ती आल्यावर तिने दिल्लीतील हे निधी उपलब्ध करणाऱ्या संस्थेला प्रस्ताव दिला.

'उंटांच्या दुधाच्या विक्रीतर्फे उंट-पालकांच्या गरिबीचे निर्मूलन.' त्यांना ही कल्पना आवडली. त्यांनी शक्यता आजमवण्यासाठी एक सल्लागार पाठवला. त्याने गोदवारच्या रायकांना उंटांच्या दुधाची विक्री करण्याच्या त्यांच्या प्रकल्पाला मान्यता दिली. हे गोदवारच्या रायकांना दूध विकण्यास प्रेरित करून करायचे होते. त्यांना दूधविक्रीच्या व्यवस्थापनास मदत करून, दूध गोळा करणे व त्याच्या वाहतुकीची व्यवस्था करून, स्थानिक ग्राहकांचा पाया तयार करून, समर्थनासाठी यंत्रणा तयार करून करायचे होते. ते याबाबतीत भोळे नव्हते, की सगळे सुरळीत घडेल. त्यासाठी त्यांनी येणाऱ्या अडचणींचीही यादी तयार केली. उदा. उंटांच्या दुधाच्या विक्रीस निषिद्ध समजले गेलेली सांस्कृतिक विचारसरणी, पुरवठा व व्यवस्थापन यांत स्थलांतर करणाऱ्या कळपामुळे

येणाऱ्या अडचणी व उंटांच्या दुधाचा वापर करण्यास असलेली नाराजी किंवा नकारात्मकता.

१९९५ ला त्यांचा प्रस्ताव मान्य झाल्यावर तिच्याकडे ऑफीस थाटण्यासाठी फंड होते. त्या सर्वांसाठी एक प्रोजेक्ट मॅनेजर, डायरेक्टर, सल्लागार असणार होता, मोटरबाईकवर दूध गोळा करणारी माणसे होती. इल्स या प्रकल्पाशी, त्याचे मूल्यमापन व सर्व गोष्टींची दखल घेण्यासाठी जोडलेली होती. तिची शिष्यवृत्ती संपल्यावर तिला या सर्वांचा मागोवा ठेवता येणार होता. हे सर्व दडपण आणणारे होते. अद्ययावत ऑफीस सर्व सुखसोईंनी युक्त व्हिला, मार्बलची फरशी, छोट्याश्या गल्लीत साद्री बसस्टँड समोर होते. हणमंत व रुपाराम हे त्यांचे जुने संरक्षक होते. हणमंत मध्ये खूप फरक पडलेला असतो. पूर्वीचा लाजरा व नम्र हणमंत फक्त गंभीर अथवा चिंताजनक क्षणी अचानक अवतरत असे. आता रायकांना हाताळायचे कौशल्य त्याच्यात आलेले असते. तो त्यांना हसवतो, समजावतो, रागावतो, त्यांच्या सर्व समस्या ऐकून घेतो. त्यांना योग्य सल्ला देतो. तो जिथे, जिथे जातो तिथं लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो व त्याच्या भोवती लोक जमा होतात. ती त्यांच्यासाठी काय काम करते, त्यांच्यासाठी औषधे व इतर गोष्टी उपलब्ध करते या विषयी तो रायकांना सांगतो. ते तिला प्रेमाने 'बाईजी' म्हणायला सुरवात करतात. अडोजी प्रत्येकवेळी नवीन गोष्ट करायची तयारी दाखवतो. तो त्याच्या उंटाच्या कळपाचे दूध विकायची तयारी दाखवतो. तो इअरटॅग प्रोजेक्टही पहिल्यांदा स्वीकारतो. तसेच दूध विकण्याचा प्रकल्पही स्वीकारण्यात पहिला असतो. अडोजीचा कळप राजपुराला थांबतो व रोज सकाळी एक मुलगा सायकलवर जाऊन दूध गोळा करतो. चहाच्या स्टॉल्सना दुधाची सॅम्पल्स देण्यात येतात व जेव्हा त्यांची खात्री पटते की, चहाची चव बदलत नाही तेव्हा ते उंटांचे दूध विकत घेण्यास तयार होतात. एकूण नऊ कुटुंबे दूध विकायला तयार होतात. नंतर आणखी एक जण तयार होतो. पण त्यानंतर कित्येक महिने काहीच प्रगती होत नाही.

नंतर हणमंत एका भोपाची मदत घेतो. त्यालाही असे वाटते की, बदलत्या काळात उंटाचे दूध विकायला काहीच हरकत नाही. भोपा, लोकांना त्याची संमती दाखवण्यासाठी हणमंतला गव्हाचे बी देऊन ते लोकांमध्ये वाटायला सांगतो. आता चित्र बदलते. अनेकजणांना या प्रकल्पांत भाग घ्यायचा असतो. पण दोन वर्षांनी प्रकल्प बंद पडतो. कारण रायकांना हे खूप जास्त काम वाटते.

त्यांची परंपरेने आलेली पद्धत, नर उंटांची पैदास व विक्री, युद्धामध्ये व वाहतुकीसाठी वापर, दुधासाठी उंट पाळणे हे त्यांच्या धोरणाच्या विरुद्ध होते. कारण जर लहान वाढणारी पाडसे दुधापासून वंचित राहिली, – जी दिवसभर बांधलेली असतात व गरीब व लोभी रायकाने सर्व दूध विकण्याचा प्रयत्न केला तर तरुण उंट पौष्टिक आहार न मिळाल्यामुळे अनेक रोगांना बळी पडतील. त्यामुळे तरुण उंटांच्या संख्येत घट येईल. म्हणजे तर्कहीन निषिद्ध वाटणारी परंपरा शहाणपणाची ठरते असे एल्सला मागे वळून विचार करतांना वाटते.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***०२२-२५४२ ६२७०***

# राष्ट्रीय सन्मानाचा अपमान टाळण्यासाठीच्या कायद्याची ओळख

*आपण आपल्या ध्वजाबाबत कोणकोणती काळजी घेणं हे या लेखात स्पष्टपणे सांगितले आहे. प्रत्येक भारतीयाने एक अत्यंत महत्त्वाचे नैतिक कर्तव्य म्हणून यातील सर्व मुद्यांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. – संपादक*

भारत हा विविधतेने नटलेला, अनेक धर्म, जाती, भाषा आणि परंपरा असलेला देश आहे. या विविधतेतून एकतेकडे नेणारी काही प्रतीके आपल्याला राष्ट्रीय पातळीवर एकत्र बांधून ठेवतात. यात राष्ट्रीय ध्वज (तिरंगा), भारताचे संविधान, आणि राष्ट्रीय गीत (जन गण मन) ही प्रमुख चिन्हं आहेत. या प्रतीकांचा सन्मान राखण्यासाठीच, 'राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१' हा कायदा करण्यात आला.

हा कायदा सांगतो की, आपण जाणीवपूर्वक किंवा मुद्दामहून राष्ट्रीय ध्वज, संविधान किंवा राष्ट्रीय गीताचा अपमान करू शकत नाही. उदाहरणार्थ, जर कोणी तिरंग्याला पायदळी तुडवत असेल, फाडत असेल, जाळत असेल, किंवा तो ध्वज चुकीच्या पद्धतीने वापरत असेल – जसं की कपड्यांवर, जाहिरातीत किंवा शोभेसाठी – तर हे गुन्हा मानलं जातं. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय गीत सुरू असताना उठून उभं न राहणं, किंवा त्या वेळी गोंधळ घालणं हेदेखील अपमान मानला जातो – जर ते मुद्दाम केलं असेल.

या कायद्यांतर्गत अशा अपमानासाठी तीन वर्षांपर्यंत जेल होऊ शकतो, किंवा दंड, किंवा दोन्ही होऊ शकतात. सरकारने वेळोवेळी सूचना आणि नियम जारी करून आपल्याला योग्य पद्धतीने ध्वज फडकवण्याचे आणि सन्मान करण्याचे मार्ग सांगितले आहेत. आपण अनेकदा शाळा, सरकारी कार्यालये किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये हे पाहतो. पण आपल्या दैनंदिन आयुष्यातही या चिन्हांचा आदर ठेवणं हे आपलं कर्तव्य आहे.

हा कायदा केवळ शिक्षा देण्यासाठी नाही, तर आपल्यामध्ये देशभक्तीची भावना जागवण्यासाठी आहे. आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, पण त्याचा अर्थ राष्ट्रीय प्रतीकांचा अपमान करण्याची मुभा नाही. म्हणूनच, आपण नागरिक म्हणून हा कायदा समजून घ्यावा, आपल्या कृतीतून देशाबद्दलचा आदर दाखवावा, आणि इतरांनाही हे सांगावं. कारण राष्ट्राचा सन्मान ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

**डॉ. रुपाली श्याम जामोदे**
सहा. प्राध्यापक
व्ही.पी.एम.टी.एम.सी.लॉ कॉलेज
ठाणे

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# मग तयांपाशी मी, असे ठरविले, माझे जाणे...

*ज्येष्ठ हिंदी लेखक विनोद कुमार शुक्ल यांना यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला असून त्यांच्यावरील लेख - संपादक*



घरभर खेळणी आणि पुस्तकं पसरलेली. ती तशी असण्यातच घरात मुलगी, जावई आणि अर्थात नातू अशा सर्वांना सुख.. संतोष. सुमेध महिन्याभराने सव्वा दोन वर्षांचा होईल अशा वयाचा.. दिवसभर घरभर दुडदुडणारा. जेव्हा हवं तेव्हा ते ते खेळणं वा पुस्तक घेऊन समोर येणं आणि खेळू या किंवा वाचू या असा सामोरा येईल त्याच्याकडे लकडा लावायचा हा त्याचा नित्यक्रम. काल खूप दिवसांनी, खरं तर महिन्यांनी तो त्याचं एक लाडकं पुस्तक घेऊन आला. ढीगाखाली गेल्याने बहुधा मागे पडलेलं.. पण काल पुस्तकातल्या जेराल्डने आपली लांब मान बहुधा बाहेर काढली असावी. जेराल्ड.. पुस्तकातला कथानायक.. जिराफ. 'नाचता येईना, जिराफांना!' (जिराफ्स कान्ट डान्स) नावाचं जिलेस आंद्रे ह्या लेखकाचं छान गंमतबोध देणारं चित्रकथेचं पुस्तक. कथानक काहीसं असं... जंगलात प्राणिसंमेलनातील नृत्यांगणात एकेक प्राणी नाचून जातो. सारे छान मजा घेत असतात. आणि आता जेराल्डची... जिराफाची पाळी येते. त्याच्या लंबेलांब पायांमुळे आणि लांबुडक्या मानेमुळे त्याला शरीराचं नीट संतुलन करता येत नाही, त्याच्या हालचाली वेधक न वाटता वेडसर वाटू लागतात आणि सर्व प्राणी हसहसून त्याची टिंगलटवाळी करतात. जेराल्ड हिरमुसून जातो, कोमेजतो. पराभूत पावलांनी नृत्यांगणातून बाहेर पडतो आणि जंगलाकडे जाऊ लागतो. रात्र झालेली असते. असं खचलेलं रडुरडू मन आणि दाट गडद होणारा काळोख. पाय ओढत ओढत कितीतरी दूर येतो. तेवढ्यात आकाशाच्या काळ्या पडद्यावर दूध उतू जावं तसा चंद्रप्रकाश पसरू लागतो. जेराल्डचं मन हळूहळू निवू लागतं. निवळू लागतं. ढगाआडून चांदोबा दिसल्यावर तर कुढणारं त्याचं मन भवतालातील अन्य गोष्टी पाहू, ऐकू लागतं. आकाशातून ओघळणारा रुपेरी प्रकाश पीत जेराल्ड शांतावून, सुखावून थबकतो. तर आणखी एक गंमत घडते. एका सुरात वाजणारी व्हायोलीन ऐकू येतात. आपली लांबडी मान इकडे तिकडे करून तो कलावंताला शोधू लागतो. आणि त्याला मग्न होऊन वाजविणारा रातकिडा दिसतो. जेराल्ड जवळीकीने त्याच्याशी बोलू पाहतो. आणि मोकळेपणाने त्याला आपली फजिती सांगतो. रातकिडा आपुलकीने ऐकतो आणि व्हायोलीनची एक गत वाजवून म्हणतो, 'मित्रा जेराल्ड, नाचता न येणं हे तुझ्या निराशेचं खरं कारण नाही. खरं कारण आहे तुला तुझी धून मिळालेली नाही. ती तुझी उणीव आहे. तेवढी शोध, की जिंकलं!'

जेराल्ड विस्मयाने ऐकतो आणि मनाशी गुणगुणू लागतो. त्याची एकदम तंद्री लागते आणि तो गाऊ लागतो.. आणि नाचूही लागतो. त्याचं त्यालाच नवल

वाटतं. तो रातकिड्याचे आनंदाने आभार मानतो. वर चांदोबाला झाकणारा ढगोबाही दूर झालेला असतो. त्याच्या स्वच्छ रुपेरी प्रकाशात जेराल्ड परत मागे फिरून धावू लागतो...नृत्यांगणाकडे.

नृत्यांगणातून आनंदाचे चित्कार येतच असतात. धावत जवळ जवळ येणारे टापांचे आवाज ऐकून सारी नृत्यांगण सभा क्षणभर मूक होउन त्या दिशेने पाहू लागते. आणि त्यांना जेराल्ड दिसतो. आनंदात गात गात धावत येणारा. जेराल्ड जवळ.. अगदी जवळ येत नृत्यांगणाच्या मध्यमंचावर येतो. आणि भान विसरून गाऊ लागतो, नाचू लागतो. ते त्याचं तन्मय होऊन गाणं नाचणं पाहून सगळी प्राणीसभा आनंदात डोलू लागते. उल्हासाने टाळ्या वाजवून जेराल्डचं कौतुक करू लागते...

सुमेध एकेका चित्रावर बोट ठेवतो आणि पूर्णा जेराल्डची कहाणी रंगवत जाते.

गोष्ट इथे संपते. पण खरी गोष्ट सुरू होते.. ऐकणाऱ्या प्रत्येकाचीच.

जेराल्डचं पुस्तक मिटतं. आणि मला आणखी एका जिराफाची गोष्ट आठवते. जिराफाइतकीच त्याच्या सुमेधसारख्या एका शिशुमित्राची गोष्ट. गोष्टीचा पसारा मांडत नाही. पण लांबोड्या मानेने उंच उंच झाडांच्या उंच उंच डहाळ्यांवरची पानं मजेत खात हिंडणाऱ्या जिराफाला त्याचा चिमुकला मित्र काहीशा काळजीने आणि कुतूहलानेही विचारतो 'लंबूदादा, तुम्ही एवढी उंचावरची पानं खाता. पण तिथेच त्या उंचावरची चिऊताई, कावळेदादा आणि राघूमैनेची घरटी असतात. खाता खाता ती वाचवता.. तर ती कशी बरं वाचवता?'

गोष्ट इथे संपते. पण इथेही खरी गोष्ट सुरू होते..

ऐकणाऱ्या प्रत्येकाचीच.. ही दुसरी गोष्ट सांगितली.. म्हणजे लिहिली आहे विनोद कुमार शुक्ल ह्यांनी.

चार दिवस गावाबाहेर होतो त्यामुळे वृत्तपत्रं पहायचीच राहिली होती. आणि सकाळी नानूच्या.. म्हणजेच सुमेधच्या जेराल्डमुळे आठवलेल्या जिराफ आणि त्याच्या शिशुमित्राच्या गोष्टीचे लेखक विनोद कुमार शुक्ल ह्यांची रविवारच्या वृत्तपत्रातील पहिल्या पानावरच्या आनंददायी बातमीतून पुनर्भेट झाली.

मार्क्स ते माओ अशा सर्व विध्वंसक छटांच्या नक्षली हिंसक कारवायांमुळे वृत्तप्रकाशात असलेल्या छत्तीसगढ ह्या नक्षली 'ठो ठो' आणि त्याला प्रत्युत्तर देणाऱ्या पोलिसी 'ठो ठो'चा कष्टाने अपवाद केला तर एरव्ही नीरव मुलुखातला कवी, लेखक ज्ञानपीठ पुरस्काराचा त्या राज्यातला पहिला धनी होतो ही मोठीच आनंदवार्ता.

घरातच सुघटित वाचन-वारसा मिळालेले विनोद कुमार शुक्ल बालवयात ऐकलेल्या, वाचलेल्या गोष्टींतून स्वतःची गोष्ट घडवीत गेले. आंद्रेच्या जेराल्डला रातकिड्याच्या व्हायोलीनमधून आणि रुपेरी चंद्रबिंबातून स्वतःची धून सापडली. तसंच काहीसं बाल विनोदचं झालं असावं. आईचं माहेर-घर वंगभूमीतलं. मातुल आजोबांनी तर विभाजनकालीन संघर्ष पाहिला आणि संहार सोसला. त्यातच त्यांचं प्राणपाखरू जळूनही गेलं. पण आई वंगभूमीतून वेदनेसोबत वाङ्मयवारसाही स्त्रीधनासारखा घेऊन आली होती. त्यामुळे संहारातून सक्षम होण्याचा संदेश घेत स्वतःचं अस्तित्व, 'स्व'बोध करून देणारं, जागं ठेवणारं बंकिमबाबू, रोबीदा आणि शरदबाबू ह्या त्रिवेणीचं आचमन शुक्ल कुटुंबात होत राहिलं.

बाल विनोदकुमारांनी रोबीदा.. अर्थात रवींद्रनाथांचं बालसाहित्य कुतूहलाने ऐकलं असावं. त्यांची 'पोपटाची कहाणी' मनात खोल रुजवली असावी. पाखराच्या विषयीची ती ओलच पुढे जिराफकथेत बालमुखातून व्यक्त झाली असावी.

विनोद कुमार शुक्ल आपला प्रवास सांगताना म्हणतात की, 'मी बारावीत अनुत्तीर्ण झालो.. तेही हिंदी विषयात म्हणून पुढे डॉक्टर इंजिनीअर न होता लेखक झालो.'

बालवयातच कवितेचं फुलपाखरू त्यांच्या हातावर बसलं.. तो रंग जीवनभर तसाच राहिला.. आजवर. विशीत असताना हिंदीतील ज्येष्ठ कवी गजानन माधव मुक्तिबोधांची गाठ पडली. ह्यांच्या भावाने कवींना हा माझा भाऊही कविता करतो असं सांगितलं. मुक्तिबोधांनी औत्सुक्याने कविता पाहिल्या, वाचल्या. एवढंच नाही तर काही स्वतःच प्रसिद्धीला पाठवून दिल्या.

रवींद्र-साहित्यातून ही अशी स्वतःची धून शोधण्याची बाळगुटी पिऊन सक्षम झालेल्या ह्या छत्तीसगढी कवीला ह्या मुक्तिबोध-मूळाची आठवण देत काही वर्षांपूर्वी पुरस्कारवापसी टोळीने भारण्याचा प्रयत्न केला होता. विनोद कुमार म्हणाले होते, 'उंच आकाशात जाणारा पतंग हाती देऊन मुक्तिबोध तर निघून गेले. आता माझा पतंग, माझं आकाश शोधत गेला, वर चढत राहिला.' त्यामुळेच ते बधले नाहीत तर त्यांना घेरण्याचाही उपद्व्याप केला होता. पण हा 'स्व'बोधधन्य कवी दृढ राहिला. १९९९ मध्ये त्यांच्या 'दीवार में एक खिड़की रहती थी' ह्या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. विनोद कुमारांनी खिडकी तर बंद केली नाहीच, पण तिथला सन्मानदीपही तसाच तेवता ठेवला.

विनोद कुमार आपल्या प्रतिभेविषयी सांगतात की, 'मला कविता वा एकूणच साहित्य भाषेतून सुचत नाही. तर ते सुचतं प्रतिमांतून.. चित्रातून. आदिम काळात असंच झालं असेल ना.. भाषा, लिपी तर खूप मागून आले. तसंच काहीसं. परिणामी त्यांचं लेखन आपल्या भाषेहून भिन्न भाषेत झालेलं असलं तरी मुळाशी असलेल्या प्रतिमा, चित्रांमुळे गतीने आपलं होतं. तार छेडून जातं, संवादी होतं. आणि त्यामुळेच त्यांनी दाखविलेलं वास्तवाचं चित्र, -

वस्तूंचे प्राण मला लाविती दिनरात पिसे ।
पागल मी पागल मी वास्तवता मज न दिसे ।।

असं जे आपले बाकिबाब म्हणतात ना तशा काहीशा जादूगिरीने लकाकून जातं.

रवींद्रनाथांची त्यांनी लिहिलेल्या बालसाहित्यातील एका कवितेचा इथे संदर्भ द्यायचा मोह होतो. त्यांची 'प्रवासी' ही कविता विनोद कुमारांनी बालवयातच वाचली असेल. जवळपास एकशेसाठ पंक्तींची ही कविता मोठीच.. आकार आणि आशय म्हणूनही. त्याचा प्रारंभ असा होतो..

माझे घर साऱ्या ठायी । त्यासी मी शोधित राही ।
देशोदेशी स्वदेशी ही । इच्छांना जाणून घेई ।।
असे प्रवासी । ज्या दाराशी ।
उभा राहतो पांथ जिथे ।
आश्रय गवसे मला तिथे ।।
प्रवेश करणे कोठोनी ।
मी ते घेईन समजोनी ।।

(अनुवाद : सरोजिनी कमतनूरकर )

असं विश्वालाच नीड.. घरटं मानत साऱ्या समष्टीकडे धाव घेणारं 'रवी'मन आणि अशा सर्व भवतालाला भेटण्याच्या आकांक्षेला एकमात्र अंतिम इच्छेसारखं जपू पाहणारं विनोद कुमार शुक्ल ह्यांचं 'कवी'मन त्या बालवयात वाचलेल्या 'प्रवासी' कवितेशी आपला जन्मनाळेसारखा घट्ट अनुबंधच व्यक्त करीत असतं.

विनोद कुमार शुक्ल ह्यांच्या त्याच कवितेचा भावानुवाद इथे सविनय प्रस्तुत करताना कविविषयी

(पृष्ठ क्र. २७ वर)

# वक्फ कायदा सुधारणा विधेयक : ही विकृती संपायलाच हवी...

*नुकतेच संसदेमध्ये वक्फ कायदा सुधारणा विधेयक सादर झाले. या एकूण कायद्याच्या अनुषंगाने प्रस्तुत उद्बोधक लेख ज्येष्ठ अभ्यासक अभिजीत जोग यांनी लिहिला आहे. - संपादक*

वक्फ कायदा सुधारणा विधेयक आज संसदेत सादर झाले आहे. आता यावरून खूप गदारोळ करण्यात येईल. 'भारतात अल्पसंख्यांकांवर कसा अन्याय होतो आहे, मोदी सरकार कसे फॅसिस्ट आहे' हा ओरडा टिपेला नेण्यात येईल. संविधानाच्या प्रती हातात घेऊन नौटंकी केली जाईल. सर्वसामान्यांच्या मनात 'खरंच काही चुकीचं तर घडत नाहीये ना?' अशी शंका निर्माण केली जाईल. यात, धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली मुस्लीम अनुनयाचा अतिरेक करणाऱ्या स्यूडो-सेक्युलर पक्षांचा आणि त्यांच्याही वरचा सहभाग दरबारी पत्रकारांचा आणि सारासार विवेक गुंडाळून ठेवलेल्या स्यूडो लिबरल टोळीचा असेल.

त्याला बळी पडण्याआधी, हा विषय नेमका काय आहे हे समजून घेणं गरजेचं आहे. वक्फ हा एक इस्लामी ट्रस्ट आहे ज्यावर अल्लाची मालकी असते. या ट्रस्टला दान केलेली मालमत्ता चॅरिटेबल कामांसाठी वापरली पाहिजे असे बंधन नसते. धार्मिक कार्य हे तिचे उद्दिष्ट आणि श्रद्धा हा तिचा आधार असतो. एखादी मालमत्ता एकदा वक्फच्या मालकीची झाली की ती परत करता / मागता येत नाही. Once a Waqf, always a Waqf !

ऐतिहासिक दृष्ट्या भारतात आणि जगभर वक्फचा वापर हा इस्लामचा प्रसार, धर्मांतर आणि इतर धर्मियांची धार्मिक स्थळे बळकावणे यासाठी केला गेला आहे. भारतात इस्लामिक सल्तनतींच्या काळात न्यायव्यवस्था मुल्ला-मौलवींच्या हातात असल्यामुळे आणि त्यांचे न्यायदान शरिया कायद्यावर आधारलेले असल्यामुळे वक्फचा वापर भारतभर सूफींचे जाळे पसरविण्यासाठी झाला, ज्याचा उपयोग त्यांचे महत्त्व वाढून त्यांच्या धर्मांतराच्या कारवायांसाठी प्रामुख्याने झाला.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानातील जे हिंदू भारतात आले त्यांच्या मालमत्ता एकतर सरकारजमा करण्यात आल्या किंवा त्या स्थानिक मुस्लिमांनी बळकावल्या. भारतातील जे मुस्लीम पाकिस्तानला गेले त्यांच्या मालमत्ता मात्र वक्फ बोर्डाला देण्यात आल्या. यासाठी १९५४ चा वक्फ कायदा लागू करण्यात आला. अशाप्रकारे मुस्लीम मुल्ला-मौलवींकडे आर्थिक शक्तीचा एक स्रोत तयार झाला. कारण सर्वसामान्य मुस्लिमांच्या भल्यासाठी नव्हे, तर नेहमी मूठभर धर्मांधांच्या स्वार्थासाठीच या मालमत्तांचा वापर झाला.

१९५४ च्या या कायद्यात १९६४, १९६९, १९८४ मध्ये अनेक बदल करण्यात आले. १९९५ साली तथाकथित सेक्युलर पक्षांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली या कायद्यात असे बदल केले की, कायद्याचे राज्य या संकल्पनेला धाब्यावर बसवणारी पाशवी शक्ती मुल्ला-मौलवींच्या हाती सुपूर्त करण्यात आली. या कायद्यानुसार केवळ मुस्लिमांना स्थान असलेल्या वक्फ ट्रायब्युनलची स्थापना करण्यात आली. वक्फ बोर्डाने दावा केलेल्या मालमत्तांविषयी कोणाची तक्रार असल्यास तिचे निवारण करण्याचा अधिकार केवळ वक्फ ट्रायब्युनलला देण्यात आला. मालमत्तेविषयीची प्रकरणे कलेक्टरच्या अखत्यारीत येतात आणि त्याविषयीचे मतभेद न्यायालयात सोडविण्यात येतात. पण वक्फ

बोर्डाने दावा केलेल्या मालमत्तांच्या बाबतीत मात्र हे अधिकार 'सेक्युलर' कायदा करून एका धार्मिक गटाच्या हाती देण्यात आले आहेत.

१९९५ सालच्या कायद्यातील काही पाशवी तरतुदी बघू या –

१. वक्फ बोर्डाने आपल्या मालमत्तेवर दावा केला आहे हे मालकाला व्यक्तिशः कळवण्याची जबाबदारी वक्फ बोर्डावर नसते. त्यांनी अशा मालमत्तांची यादी प्रसिद्ध करावी इतकेच अपेक्षित असते. या यादीत आपले नाव आहे का याची खातरजमा करण्याची जबाबदारी मालकाची असते.

२. अशी यादी प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत मालकाने आपली हरकत न नोंदवल्यास वक्फ ट्रायब्युनल एकतर्फी निर्णय जाहीर करू शकते. आणि अशी हरकत नोंदवली तरी निर्णय घेण्याचा अधिकार वक्फ ट्रायब्युनलकडेच असतो!

३. या कायद्याच्या कलम ४०(१) आणि ४०(२) नुसार एखादी मालमत्ता वक्फ प्रॉपर्टी म्हणून जाहीर करण्याचे सर्वाधिकार केवळ वक्फ बोर्डाकडे असतात. त्यासाठी आवश्यक माहिती बोर्ड आपल्या पद्धतीने गोळा करू शकते. यासारख्या इतर प्रकरणांमध्ये आवश्यक असलेली जाहीर सुनावणी घेण्याची गरज वक्फ बोर्डाला लागू होत नाही. म्हणजेच कुठल्याही पारदर्शी चौकशी शिवाय बोर्ड कुठलीही मालमत्ता वक्फ प्रॉपर्टी म्हणून जाहीर करू शकते. याबाबतीत वक्फ बोर्डाचा निर्णय अंतिम असतो. तो बदलण्याचा अधिकार केवळ वक्फ ट्रायब्युनलला असतो.

४. मालमत्ताविषयक खटले सिव्हिल कोर्ट किंवा रेव्हेन्यू कोर्टात चालविले जातात. पण ट्रायब्युनलच्या निकालाविरोधात या न्यायालयांमध्ये अपील करता येत नाही. अपवादात्मक परिस्थितीत त्यासाठी हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्टात रिट पेन्शन दाखल करण्याचा खर्चिक मार्ग स्वीकारावा लागतो. आणि त्याचा निकाल लागून न्याय कधी मिळेल याची शाश्वती नसते.

५. वक्फ बोर्डाने दावा केलेली मालमत्ता आपली असल्याचे सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी फक्त मालकावर असते. अशी कुठलीही जबाबदारी नसल्यामुळे वक्फ बोर्ड अक्षरशः कुठल्याही मालमत्तेवर दावा करू शकते.

६. 'वक्फ बाय युजर' या कलमानुसार मालमत्तेची कुठलीही कागदपत्रे नसली तरी कधीकाळी ही जमीन कबरिस्तान किंवा दर्गा म्हणून तोंडी दान करण्यात आली होती असे सांगून ती वक्फ मालमत्ता असल्याचे ठरवता येते. एखाद्या सरकारी जमिनीवर कुठलीही कबर नसताना, दर्गासदृश बांधकाम करून काही दिवसांनी ती वक्फ मालमत्ता असल्याचा दावा करून ती हडप करता येते. २०१३ साली केलेल्या दुरुस्तीत वक्फ बोर्डाच्या कामात अडथळा आणल्यास गुन्हेगारी खटला दाखल करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

अशाप्रकारे इतक्या प्रचंड प्रमाणात मालमत्ता वक्फ प्रॉपर्टी म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत की; आज वक्फ बोर्ड, संरक्षण खाते व रेल्वे यांच्यानंतर देशातील तिसऱ्या क्रमांकाचे जमीन-मालक ठरले आहे.

या कायद्याने दिलेले अधिकार इतके एकांगी आणि टोकाचे आहेत की, तमिळनाडूतील तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील तिरुचेंदुराई या गावातील १५०० वर्षे जुने मंदिर आणि गावाची संपूर्ण जमीन यावर वक्फ बोर्डाने अधिकार सांगितला. इस्लाम धर्मच मुळात १४०० वर्षांपूर्वी सुरू झाला. असे असताना १५०० वर्षांपूर्वीच्या

मंदिरावर वक्फचा हक्क कसा असू शकतो हे आपले धर्मनिरपेक्षतावादीच जाणोत ! इतकेच नव्हे तर भारतीय संसदेची इमारत ज्या जमिनीवर उभी आहे तिच्यावर देखील वक्फचा दावा आहे. हरयाणातील गुरुद्वारा, सुरत महापालिकेचे मुख्य कार्यालय असलेली जागा... वक्फ बोर्डाने अशा लाखो मालमत्तांवर हक्क सांगितला आहे. २०१४ साली आपले सरकार जाणार हे लक्षात आल्यावर काँग्रेसने दिल्लीतील अनेक मोक्याच्या जमिनी वक्फच्या घशात घातल्या. हे कुठेतरी थांबणे आवश्यक आहे.

इतका एकांगी वक्फ कायदा इस्लामी देशांसकट जगातल्या कुठल्याही देशात नाही. हे भारतातल्या विकृत सेक्युलॅरिझमला आलेलं विषारी फळ आहे. भारतातही इस्लाम वगळता इतर कुठल्याही धर्मासाठी असा कायदा नाही. म्हणूनच वक्फ कायदा सुधारणा विधेयकाला चर्चनेही संपूर्ण पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या विधेयकाच्या विरोधकांनी अल्पसंख्यांकांच्या नावाने कितीही गळे काढले तरी त्यांचा कळवळा हा केवळ मुस्लिमांच्या एकगठ्ठा मतदानापुरता आहे हे लक्षात घ्यायला हवं.

अमेरिकन इतिहासकार 'अर्नॉल्ड टॉयनबी' म्हणतात,- 'Civilizations die by suicide not murder. भारतीय सभ्यतेने आत्महत्या करू नये असे वाटत असेल तर असला एकांगी कायदा मुळात रद्दच व्हायला हवा.' पण सर्वधर्मसमभावाच्या नावाखाली भारतात रुजवण्यात आलेल्या विकृती इतक्या सहजासहजी दूर होणार नाहीत. त्यामुळे या कायद्यातील सुल्तानी तरतुदी दूर करणारं हे विधेयक तरी मंजूर व्हायलाच हवं.

**– अभिजित जोग**
ज्येष्ठ लेखक, पुणे

•••

(पृष्ठ क्र.२४ वरून – **मग तयांपाशि मी, असे ठरविले, माझे जाणे**)

आदर, 'ज्ञानपीठ' सन्मानवार्तेसंबंधी आनंद आणि प्रतिमेतून उलगडणारा म्हणूनच भाषिक दूरत्व नि:शेष करणारा भारतीय कवी म्हणून वाटणारी अपार आत्मीयताच व्यक्त करतो आहे.

(विनोद कुमार शुक्ल शीर्षकाविषयी आग्रही नसतात. कविता आपल्या पहिल्या ओळीपासून आकाराला येते आणि तिला थांबायचं तिथे थांबते, पूर्ण होते. मग असं तिच्यापासून वेगळं शीर्षकाचं औचित्य काय? अशी त्यांची धारणा आहे... आपण आपल्या वाटेने जाताना ओळखीची खूण ठेवावी तसं शीर्षकाचं पीस खोऊन ठेवतो.. मी नम्रतेने तसंच केलंय.)

मग तयांपाशी मी, असे ठरविले, माझे जाणे...

होणारच नाही ज्यांचे माझ्या सदनी येणे।
मग तयांपाशी मी असे ठरविले माझे जाणे।।

नदि उफाळणारी कैशी यावी माझ्या दारी।
मी नदिजैशांसह तरण्या.. बुडण्या निघे किनारीं।।

गिरि.. कडे.. खाचरे कैसी येतील झुडुपे झाडे।
शेतांवर जावे तसेच धुंडिन पहाड पाडे।।

नित निमग्न जे जे अशा अशांच्या भेटीसाठी।
सहजी.. अविषय ना निमित्तं होईन अनन्य मोठी।।

ही हीच एक अन् अंतिमही ती जणू असावी ।
मी असे इच्छितो प्रथमही इच्छा तीच असावी ।।

विनोद कुमार शुक्ल ह्यांचे सविनय.. सानंद अभिनंदन!
अभिवादन !!

**– प्रमोद वसंत बापट**

•••

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

आंतरराष्ट्रीय Spell Bee परीक्षेचा निकाल

**स्तर तिसरा – राष्ट्रीय स्तर**

Spell Bee परीक्षेचा निकाल जाहीर करताना आम्हाला अत्यंत होत आहे. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी बजावली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!



* ६ विद्यार्थी 'Accomplishment Category' आंतरशालेय टॉपर आहेत.
* २ विद्यार्थ्यांना 'Achievement in Distinction' प्रमाणपत्र दिले मिळाले आहे.
* शाळेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी–:

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. वर्तक प्रथमेश | १ली | १०० |
| २ | कु. पाष्टे मीरा | १ली | १०० |
| ३ | कु. पिम्पले रेआ | १ली | ९० |
| ४ | कु. वीरकर स्वरांग | २री | ९४ |
| ५ | कु. गोखले अन्वी | ३री | १०० |
| ६ | कु. शितुत महेक | ४थी | ९५ |

* इयत्तेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी:–

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. धोंगडे स्पृहा | ४थी | ८४.७५ |
| २ | कु. चव्हाण अवनीश | ४थी | ८२ |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग



कृषय गाला (इयत्ता ५ वी) याने युनायटेड इंटरनॅशनल मॅथ्स ऑलिंपियाड (UIMO) २०२४–२०२५ मध्ये विजेतेपद मिळवले. ह्या आमच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय क्रमवारीनुसार ८९/१०० गुण संपादन केले आहे. हार्दिक अभिनंदन!



NSTSE विज्ञान परीक्षेत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल अद्वय परांजपे (इयत्ता ८वी), अनिश बर्वे (इयत्ता ८वी), विहान ताम्हणकर (इयत्ता ५वी) आणि माहिका सत्रा (इयत्ता १०वी) यांचे हार्दिक अभिनंदन.

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

### महाकुंभ छायाचित्र व ग्रंथप्रदर्शन –

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालय आणि डॉ. बेडेकर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात महाकुंभ सोहळ्यातील छायाचित्रांचे व निवडक पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन ११ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले होते. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे ही सर्व छायाचित्रे डॉ. महेश बेडेकर यांनी स्वतः तिथे जाऊन काढलेली होती.




दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. महेश बेडेकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल व समन्वयक प्रा. नारायण बारसे, प्रा. अंकुर काणे व मोठ्या संख्येने माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रदर्शनात कुंभमेळ्याच्या दरम्यान डॉ. महेश बेडेकर यांनी रेकॉर्ड केलेले काही व्हिडिओ देखील दाखवण्यात येत होते तसेच महाविद्यालयातर्फे प्रशिक्षित विद्यार्थी प्रदर्शनाला भेट देणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छायाचित्राची माहिती देत होते.

या प्रदर्शनाला ठाण्यातील नागरिकांचा अणि विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व इतिहास विभागातील विद्यार्थी यांनी या पूर्ण प्रदर्शनासाठी स्वयंसेवक म्हणून काम केले. त्याचबरोबर विज्ञान महाविद्यालय विधी महाविद्यालय अभियांत्रिकी महाविद्यालय व व्यवस्थापन महाविद्यालय यांच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी देखील या प्रदर्शनासाठी सक्रिय सहकार्य दिले.




डॉ. बेडेकर हॉस्पिटलचे हे ७५ वे वर्ष आहे. हे वर्ष साजरे करण्यासाठी विविध उपक्रम हॉस्पिटल तर्फे आयोजित करण्यात येत आहेत. त्यापैकी हा एक उपक्रम होता. प्रदर्शनासाठी आलेल्यांना एक आठवण म्हणून छायाचित्रांचे बुक मार्क्स मोफत देण्यात आले. 'कुंभ' या विषयावरील प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या संग्रहातील पुस्तकांचे देखील प्रदर्शन छायाचित्रांच्या जोडीला होते. ज्यांना कुंभमेळ्याला प्रत्यक्ष भेट देता आली नाही त्यांना या छायाचित्राच्या माध्यमातून व व्हिडिओच्या माध्यमातून कुंभमेळ्याचा अनुभव घेता आला. कुंभमेळ्यातील विविध आखाडे, विविध प्रथा परंपरा, प्रयागराज येथील कुंभमेळ्याचे नियोजन, करोडो च्या संख्येने भेट देणाऱ्या नागरिकांसाठीची स्वच्छतेसकट सर्व व्यवस्था इत्यादी अनेक विषयांवर ही छायाचित्रे आधारित होती. ठाण्यात आयोजित करण्यात आलेले हे पहिलेच अनोखे प्रदर्शन होते.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### ईट राईट मेला व दिमाखदार वॉकेथॉन चे आयोजन

दि. २६ मार्च २०२५ – अन्न व औषध प्रशासन, ठाणे आणि विद्याप्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'ईट राईट मेला आणि वॉकेथॉन' या आरोग्यदायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम दि. २६ मार्च २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता वॉकेथॉनने सुरू झाला. याचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळ कार्यकारिणीचे सदस्य व आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटू डॉ. महेश बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले, तर सकाळी १०:०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात भव्य कार्यक्रमात ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (IAS) व अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, आयुक्त, व कार्यक्रमाचे अध्यक्ष, श्री. राजेश नार्वेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले, यावेळी सुप्रसिद्ध दीक्षित डाएट प्लॅनचे सर्वेसर्वा डॉ. जगन्नाथ दीक्षित यांच्या 'जीवनशैली बदला व दिवसातून दोन वेळा खा आणि मधुमेह या आजाराला कायमचे हद्द पार करा' असा संदेश देणारे भाषण श्रोत्यांना अंतर्मुख करणारे ठरले.

'अन्न व औषध प्रशासन विभाग व बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे यांचे नाते खूप वर्षांचे असून यासारख्या वेगळ्या विषयावर भव्य पदयात्रेचे व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात हे महाविद्यालय अग्रेसर आहे' असे अध्यक्षीय भाषण करताना श्री. राजेश नार्वेकर म्हणाले, 'तसेच, Voter ID, Voter Day, निवडणूक जनजागृती, संविधान दिवस, या प्रकारचे कार्यक्रम बांदोडकर विज्ञान महाविद्यालय नित्यनेमाने घेत असतात' असे जिल्हाधिकारी, श्री. अशोक शिनगारे उद्घाटन पर भाषणात म्हणाले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी केले, यामध्ये पालकांनी विद्यार्थ्यांना डब्यामध्ये सकस आहार द्यावा भाजी पोळी द्यावी व आपल्या पाल्याची आरोग्य तपासणी नेहमीच करावी असे नमूद केले.

या वेळेस ग्राहक हक्क समितीचे श्री गजानन पाटील व श्री. नरेंद्र सुपे,(सहाय्यक आयुक्त औषध प्रशासन), श्री. श्रीकांत कर्कळे, सहायक आयुक्त (अन्न), डॉ. राहुल खाडे सहाय्यक आयुक्त (व्हिजिलेन्स), तसेच मुख्य कार्यकारी दंडाधिकारी रोहन घुगे (आय.ए.एस), उपस्थित होते. यावेळी इट राईट या थीमवर अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये रांगोळी भित्तीपत्रक स्पर्धा, तसेच घोषवाक्य स्पर्धा यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली, तसेच एनसीसी आर्मी बॉईजचे प्रमुख कॅप्टन बिपीन धुमाळे एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सायली दप्तरदार प्राध्यापक विनोद थोरात यांचे विशेष सहाय्य म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले, यावेळी वन महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे पीआय स्टाफ मनोज सिंग हेही आवर्जून उपस्थित राहिले, तसेच महाविद्यालयातील DLLE, जिमखाना लायब्ररी, आयटी विभाग आणि इतर अनेक विभागांचे या भव्य कार्यक्रमाला योगदान लाभले.

हा आरोग्य जागरूकतेसाठी हा ठाण्यामध्ये महत्त्वाचा उपक्रम ठरला आहे. 'ईट राईट इंडिया' मोहिमे अंतर्गत योग्य आहाराचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि संतुलित आहाराचे फायदे याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विविध आरोग्य तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आहार तज्ज्ञांचे सल्ले, आरोग्य तपासणी आणि विविध आरोग्यवर्धक स्टॉल्स चेही आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास आरोग्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले आणि या आरोग्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अन्न व औषध प्रशासन, ठाणे आणि विद्याप्रसारक मंडळाच्या बी. एन. बांदोडकर विज्ञान

महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालय परिसरात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात १५०० विद्यार्थी व ठाणेकरांनी सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी रोटरी क्लब ऑफ होरायझनच्या राधिका पद्मनाभन, तसेच निहार शास्त्री आणि हर्षद दिवेकर, ए एस कुमार हे रोटरीन यांनी स्टॉप स्पिटिंग कॅम्पेनची संकल्पना सांगून, रिक्षावाला ड्रायव्हर्स यांच्यापासून अनेक सार्वजनिक ठिकाणी घाण आणि रोगराई निर्माण होऊ न देण्यासाठी एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांना एक इनोव्हेटिव्ह पाऊस भेट देण्यात आले जे त्यांनी या रिक्षावाल्यांना देऊन शहरातील घाण होण्यापासून रस्ते व इतर सार्वजनिक ठिकाणे यांचा बचाव करण्याची संकल्पना विशद केली.

दिनांक ०८.०३.२०२५ रोजी जागतिक महिला दिन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरा करण्यात आला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी महिला दिनाविषयी माहिती सांगितली.



दिनांक १२.०३.२०२५ रोजी मा. यशवंतराव चव्हाण जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच मा. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील माहितीचे पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले.



दिनांक २३.०३.२०२५ रोजी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच शहीद दिवसाच्या माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले.

**जैवरसायनशास्त्र विभाग**

दि. २२ जानेवारी २०२५ रोजी बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या जैवरसायनशास्त्र विभागाने APX Laboratory Thane येथे भेट देऊन Food and water quality testing (अन्न आणि पाणी चाचणीचे प्रकार आणि पाण्याची चाचणी कशी करावी) याबद्दल माहिती मिळविली. यामध्ये २५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. २९ जानेवारी २०२५ रोजी जैवरसायनशास्त्र विभागाने 'CETP plant Koparkhairane' येथे भेट देऊन Wastewater treatment process (सांडपाणी प्रक्रिया) याबद्दल माहिती जाणून घेतली. यामध्ये २७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. २७ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ रोजी जैवरसायनशास्त्र विभागाने 'अन्न भेसळ आणि गुणवत्ता व्यवस्थापन' या विषयावर प्रमाणपत्र कोर्स आयोजित केला. यासाठी प्रशांत कॉर्नर कारखाना आणि बंटी पारले फूड कंपनीला भेट दिली यामध्ये अन्न पॅकेजिंग, त्याचे गुणधर्म, अन्न कायदे, अतिरिक्त पदार्थ याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. १४, १५ आणि १८ जानेवारी २०२५ रोजी जैवरसायनशास्त्र विभागाने 'AGE/PAGE Electrophoresis' या विषयावर ३ दिवसाचे सेमिनार आयोजित केले होते. यामध्ये योगिता नार्वेकर यांनी मार्गदर्शन केले.

तसेच १७ फेब्रुवारी २०२५ रोजी एक दिवसाचे 'Phlebotomy workshop' म्हणजे रक्त काढण्याची प्रक्रिया याविषयी श्री. सुजित चौधरी यांनी रक्त संकलन प्रक्रिया याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त १ मार्च २०२५ रोजी राज्यस्तरीय सात ऑनलाइन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन माननीय न्यायाधीश (निवृत्त) श्री. अब्राहम मॅथ्यू यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

खालील स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आल्या व न्यायाधीशांनी परीक्षण केले. सुमारे ८० स्पर्धकांनी राज्यभरातील विविध लॉ कॉलेजमधून या स्पर्धांमध्ये भाग घेतला. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्व विजेत्यांचे व सहभाग घेतलेल्या सर्वांचे संविधान @७५ च्या उत्सवात दिलेल्या उत्साही सहभागाबद्दल हार्दिक अभिनंदन

| | **विजेते : –** |
|---|---|
| **१. संविधानात सुधारणा सुचवा**<br>**परीक्षक :** ॲड. मिस. पलक गुप्ता, सर्वोच्च न्यायालय व ॲड. श्री. अभिजित सावंत, मुंबई | **प्रथम क्रमांक : आलिया बिलाल निर्भान**<br>(श्री. एल. आर. तिवारी कॉलेज ऑफ लॉ).<br>**द्वितीय क्रमांक :** विशाल विलास आडसूळ<br>(सुभाष देसाई कॉलेज ऑफ लॉ).<br>**तृतीय क्रमांक :** अर्चिता द्विवेदी (प्रवीण गांधी कॉलेज ऑफ लॉ, मुंबई) व तिशा खेमानी<br>(ॲड. बाळासाहेब आपटे कॉलेज ऑफ लॉ, दादर) |
| **२. संविधानातील अनौपचारिक सुधारणा यावर भाषण**<br>**परीक्षक :** बीआयटीएस लॉ, मुंबई कॅम्पसचे रजिस्ट्रार श्री. मयंक अकोले व ॲड. श्री. नीतिन उपाध्ये | **प्रथम क्रमांक:** स्वाती नामजोशी (सिद्धयोग कॉलेज ऑफ लॉ, खेड).<br>**द्वितीय क्रमांक :** दिया रमेश देशमुख<br>(नारी गुरुसहानी लॉ कॉलेज).<br>**तृतीय क्रमांक :** हेतल गलियत (जेसीसीएल, मुंबई). |
| **३. कोणत्याही औपचारिक सुधारणा यावर भाषण**<br>**परीक्षक :** ॲड. मिस. पलक गुप्ता व ॲड. श्री. अभिजित सावंत | **प्रथम क्रमांक :** साइबा खान<br>(श्री. एल. आर. तिवारी कॉलेज ऑफ लॉ).<br>**द्वितीय क्रमांक :** विराज चिकले<br>(सिद्धयोग कॉलेज ऑफ लॉ).<br>**तृतीय क्रमांक :** स्वाती नामजोशी<br>(सिद्धयोग कॉलेज ऑफ लॉ). |
| **४. स्वतःचा विधेयक/सुधारणा विधेयक सादर करा**<br>**परीक्षक :** श्री. मयंक अकोले व श्री. नीतिन उपाध्ये | **प्रथम क्रमांक :** गाथा शशिकांत सावंत<br>(सुभाष देसाई कॉलेज ऑफ लॉ).<br>**द्वितीय क्रमांक :** पल्लवी महेश उदवंत<br>(NBT लॉ कॉलेज, नाशिक).<br>**तृतीय क्रमांक :** अमन देसाई (प्रवीण गांधी कॉलेज ऑफ लॉ) |

कधी-कधी खूप काही बोलण्यापेक्षा, गप्प राहिलेलं कधीही चांगलं!

| | |
|---|---|
| **५.पथनाट्य स्पर्धा**<br>**परीक्षक :** प्रा. डॉ. सौ. सुनीथा के के,<br>भांडूप मेनन कॉलेज, मुंबई | **प्रथम क्रमांक :** बीसीटी कॉलेज ऑफ लॉ,<br>नवी पनवेल.<br>**द्वितीय क्रमांक :** सुभाष देसाई कॉलेज ऑफ लॉ,<br>कांदिवली.<br>**तृतीय क्रमांक :** सिद्धयोग लॉ कॉलेज, खेड, रत्नागिरी |
| **६.घोषवाक्य लेखन स्पर्धा**<br>**परीक्षक :** ४ प्राध्यापकांच्या पथकाने दोन स्तरांवर<br>परीक्षण केले. | **प्रथम क्रमांक :** ऐश्वर्या दुकारे<br>(व्हीपीएम टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे).<br>**द्वितीय क्रमांक :** कुलसुम देवजानी<br>(न्यू लॉ कॉलेज, सांगली).<br>**तृतीय क्रमांक :** रुध्राक्षी दवे<br>(प्रवीण गांधी कॉलेज ऑफ लॉ, मुंबई). |
| **७. जनहित याचिका मसुदा लेखन स्पर्धा**<br>**परीक्षक :** ॲड. सौ. अदिती आठवले,<br>मुंबई उच्च न्यायालय | **प्रथम क्रमांक :** शैली शेख (पीजीसीएल, मुंबई).<br>**द्वितीय क्रमांक :** विशाल आडसूळ<br>(सुभाष देसाई कॉलेज ऑफ लॉ, कांदिवली).<br>**तृतीय क्रमांक :** सृष्टी शास्त्री (पीजीसीएल, मुंबई). |
| **सर्वोत्कृष्ट कॉलेज पुरस्कार** | १) सिद्धयोग लॉ कॉलेज, खेड जि. रत्नागिरी ला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक (२७ गुणांसह) मिळाले.<br>२) पीजीसीएल लॉ कॉलेज, मुंबई हा उपविजेता ठरला (२५ गुणांसह). |




**अभ्यासदौरा**

कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौरा समिती सदस्यांनी हा दौरा आयोजित केला.

श्री. यतिन पंडित, डॉ. रुपाली जमोदे, श्रीमती कृष्णा कामत, श्रीमती समता जोशी

व्हिपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे च्या विद्यार्थ्यांना कायदेशीर प्रणाली व प्रशासन याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी हा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. हा दौरा २ मार्च २०२५ रोजी सुरू झाला, ज्याचा उद्देश दिल्लीतील महत्त्वाच्या कायदेशीर आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणे हा होता.

**प्रस्थान आणि प्रवास**

२ मार्च २०२५ रोजी रविवारी, छत्रपती शिवाजी टर्मिनस मुंबई (CSTM) येथून ट्रेन क्रमांक 22221 NZM राजधानी एक्स्प्रेसने अभ्यास दौऱ्याची सुरुवात झाली. प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी कायदेशीर विषयांवर चर्चा केली आणि आगामी भेटींसाठी तयारी केली. गट ३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर पोहोचला.

**३ मार्च २०२५**

पोहचल्यावर, पूर्वनियोजित हॉटेलमध्ये चेक-इन करून थोडा वेळ विश्रांती घेऊन नाश्ता व भोजन केले. पहिल्या दिवसाची सुरुवात जेवणानंतर मोठ्या उत्साहाने झाली. हा दिवस शैक्षणिक तसेच मनोरंजक उपक्रमांनी भरलेला होता.




**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग**




**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग मान्यवरांचा सत्कार**

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC) ला भेट – दुपारी २:३० वाजता**

अभ्यास दौऱ्याचा पहिला शैक्षणिक कार्यक्रम NHRC मध्ये झाला. या सत्रात मानवाधिकार, कायदेशीर प्रक्रिया आणि तपास पद्धती याविषयी माहिती मिळाली.

**१. श्री विनोद कुमार तिवारी यांचे स्वागतपर भाषण**

श्री विनोद कुमार तिवारी, झारखंड राज्याचे न्यायाधीश आणि NHRC कायदा विभागाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि NHRC च्या कार्यपद्धतींचे विवेचन केले.

**२. श्री संजीव शर्मा, वरिष्ठ प्रणाली विश्लेषक यांचे सादरीकरण**

श्री संजीव शर्मा यांनी NHRC च्या वेबसाईट आणि तक्रार नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली आणि प्रत्यक्ष ऑनलाइन दाखवून दिले.

**३. श्री हरीलाल चौहान, IPS, वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांचे सत्र**

श्री हरीलाल चौहान यांनी NHRC च्या तपास शाखेच्या कार्यपद्धतीवर मार्गदर्शन केले.

**४. सुश्री मोनिका, विभाग पर्यवेक्षक यांचे समारोप**

सुश्री मोनिका यांनी संपूर्ण सत्राचा आढावा घेतला आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

**इंडिया गेट ला भेट**

NHRC मधील सत्रानंतर विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक भारत दरवाजाला भेट दिली. त्यांनी राजमार्गावरून फिरत या युद्ध स्मारकाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेतली.

**चांदणी चौकची सफर**

विद्यार्थ्यांनी दिल्लीतील प्रसिद्ध चांदणी चौक येथे फेरफटका मारला. त्यांनी स्थानिक पदार्थांची चव घेतली आणि जुन्या दिल्लीचे वैशिष्ट्यपूर्ण वातावरण अनुभवले.

आयुष्यात पुन्हा पुन्हा कोणी येत नाही; त्यामुळे समोरच्याची कदर करायला शिका!

**दुसरा दिवस – ४ मार्च २०२५ सकाळी कुतुबमिनार भेट**

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी यूनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेल्या कुतुबमिनारला भेट दिली.

**सुप्रीम कोर्ट ला भेट**

१:०० वाजता सर्वोच्च न्यायालयाला भेट देण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्री. अभय ओक यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला आणि त्यांना न्यायालयीन प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.



**न्यायमूर्ती श्री. अभय ओक ह्यांच्याशी झालेली भेट**

विद्यार्थ्यांनी सुप्रीम कोर्टाच्या संग्रहालयालाही भेट दिली. तिथे त्यांनी न्यायालयाच्या इतिहासावरील माहितीपट पाहिला.



**सर्वोच्च न्यायालयाची भेट**

**संध्याकाळी लाल किल्ला आणि अक्षरधाम मंदिर भेट**

विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक लाल किल्ला आणि अक्षरधाम मंदिराचा प्रकाश व जलप्रदर्शन अनुभवला.

**तिसरा दिवस – ५ मार्च २०२५ – जुने आणि नवीन संसदेचे दर्शन**

विद्यार्थ्यांनी संसद भवनाला भेट दिली आणि लोकसभा व राज्यसभा प्रक्रियेविषयी सखोल माहिती घेतली.



**जुने संसद भवन**




**नवीन संसद भवन**

**राष्ट्रपती भवन भेट** – संसदेच्या भेटीनंतर, राष्ट्रपती भवनातील ऐतिहासिक कक्ष, समारंभ हॉल आणि मुगल गार्डन यांचे दर्शन घेतले.

**संध्याकाळी ऋषिकेशला प्रस्थान –**

चौथा व पाचवा दिवस – ६ व ७ मार्च २०२५ – विद्यार्थ्यांनी हृषिकेशमधील राम झुला, त्रिवेणी घाट

येथे गंगा आरतीचा अनुभव घेतला. रात्री सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**सातव्या दिवशी हरिद्वारहून मुंबईला प्रयाण.**

**अभ्यास दौऱ्याचा समारोप –** हा अभ्यास दौरा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक ठरला. कायदेशीर प्रणाली, संसदीय कार्यप्रणाली, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यांचा अनुभव मिळाला. हा दौरा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास उपयुक्त ठरला.

**७ मार्च –** डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांना बी.सी.टी. विधी महाविद्यालय पनवेल येथे ७ मार्च रोजी विद्यार्थी व शिक्षक ह्यांना नवीन 'गुन्हेगारी कायद्यांतर्गत महिला सुरक्षा' ह्या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता आमंत्रित करण्यात आले होते.

**महिला दिन –**

विद्या प्रसारक मंडळ ठाणे म्युनिसिपल काऊन्सिल विधी महाविद्यालय येथे दिनांक ०८/०३/२०२५ (W.D.C.) मार्फत महिला दिवस साजरा करण्यात आला.

**सूत्रसंचालन –**

महिला विकास कक्ष सदस्य व द्वितीय वर्ष विद्यार्थिनी हेमलता मावरी हिने सूत्रसंचालन केले. आंतरराष्ट्रीय महिला दिवस हा महिलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या कामगिरीसाठी साजरा केला जातो. या दिवशी महिलांना तिच्या हक्कांबद्दल जागरूक केले जाते. तसेच महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा समजला जातो.

**प्रास्ताविक –**

या प्रसंगी प्रास्ताविक डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले. महिला दिनाच्या या खास प्रसंगी मुलींच्या सशक्तीकरण आणि समानतेच्या मार्गावर प्रगतीसाठी विविध बाबींवर चर्चा करणे आवश्यक आहे. महिला सशक्तीकरणाचे महत्त्व जाणून घेऊन त्या पद्धतीने समाज परिवर्तन होणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

**कर्तृत्ववान महिलांचे रोल –** याप्रसंगी विद्यार्थ्यांनी कर्तृत्ववान महिलांचे विविध रोल सादर केले. प्रसंगी न्यायमूर्ती फातिमा बीबी यांचा रोल डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केला. फातिमा बीबी या १९८९ मध्ये सर्वप्रथम सुप्रीम कोर्ट न्यायाधीश बनल्या होत्या. प्रसंगी वेगवेगळे महिला कर्तृत्ववान महिलांचे रोल विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केले. राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, जोतिबा फुले, इंदिरा गांधी, राणी लक्ष्मीबाई व इतर.

**भाषण –** महिला विकास कक्ष अध्यक्ष हेतल मिशेरी यांनी 'महिला सक्षम होण्याची आज गरज आहे' असे सांगितले. महिला विकास कक्ष प्रतिनिधी सहायक प्राध्यापक चंदनी घोगरे यांनी, 'भारतीय संविधानात महिलांविषयी विशेष कायदे करण्याचा अधिकार हा महिला सबलीकरण करण्यासाठी कायद्यात तरतुद करण्यासाठी व तसे कायदे बनवण्यासाठीचा महत्त्वाचा अधिकार आहे' असे सांगितले.

महिला विकास कक्ष सदस्य व विधी द्वितीय वर्ष विद्यार्थिनी शर्मिला तोडकर हिने २०२५ ची आंतरराष्ट्रीय थीम व इतर मागील पाच वर्षांतील आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या थीम सांगून त्याचे अनुसरण हे सर्वांनी महिला उन्नतीसाठी केले पाहिजे असे सांगितले.

**प्राध्यापक भाषण :** सहयोगी प्रा. विनोद वाघ यांनी कायदा आणि महिला सबलीकरण याबद्दल भाष्य केले. तसेच सहयोगी प्रा. मिथुन बनसोडे यांनी महिला कायद्याविषयी जागृती करणे आवश्यक आहे असे सांगितले.

**आभार प्रदर्शन :** हेमलता मावरी यांनी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

---

हातावरील रेषेत दडलेले भविष्य बघू नका; त्याच हाताने कष्ट करा व स्वतःचे भविष्य घडवा.

**उपस्थिती :** सदर कार्यक्रमास सा. प्रा.विनोद वाघ, प्रा. हेतल मिशेरी, सा.प्रा. चंदनी घोगरे, सा.प्रा.शिवाजी बिबे, सा.प्रा. मनोज नाईक, सा.प्रा.प्रेरणा वसावे व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

- महाविद्यालयाची अंतर्गत परीक्षा (Internal Exam) दिनांक २१,२२,२७,२८ मार्च रोजी घेण्यात आली.
- डी.पी.सी. परीक्षा दिनांक १५ व २९ मार्च रोजी घेण्यात आली.
- दिनांक २२ मार्च रोजी महाविद्यालय विकास समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ह्यांची बैठक पार पडली.

**२२ आणि २३ मार्च परिषद : 'कॉमनवेल्थमधील कायदा आणि तंत्रज्ञान : नवोपक्रम, आव्हाने आणि नैतिक सीमेवर वाटचाल'**

'कॉमनवेल्थमधील कायदा आणि तंत्रज्ञान : नवोपक्रम, आव्हाने आणि नैतिक सीमेवर वाटचाल' या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी हॉटेल कोर्टयार्ड बाय मॅरियट, मुंबई येथे संपन्न झाली. डॉ. रुपाली जमोदे, सहाय्यक प्राध्यापक आणि डॉ. श्रीविद्या जयकुमार, कार्यकारी प्राचार्य, व्ही.पी.एम.'स टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे यांनी या प्रतिष्ठित परिषदेतील सहभाग नोंदवला. ही परिषद कॉमनवेल्थ लीगल एज्युकेशन असोसिएशन (CLEA) यांच्या पुढाकाराने, एम.के.ई.एस. कॉलेज ऑफ लॉ, अमिटी लॉ स्कूल, आणि स्म्त. कमलाबेन गंभिरचंद शाह लॉ स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या परिषदेची सुरुवात विविध राष्ट्रांतील मान्यवर न्यायमूर्ती आणि कायदे तज्ज्ञांच्या उपस्थितीत झाली. उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे मा. न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती, भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि CLEA चे प्रमुख संरक्षक, यांनी उद्‍घाटनपर भाषण केले. त्यांच्या भाषणात तंत्रज्ञानाच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीसमवेत कायदेशीर चौकटी कशा प्रकारे सजगपणे घडवल्या पाहिजेत, यावर भर देण्यात आला. विशिष्ट अतिथींच्या मनोगतांमध्ये सहभागी होते:

- डॉ. आर. वेंकटारमणी, भारताचे विधी महाधिवक्ता आणि CLEA चे संरक्षक.
- मा. न्यायमूर्ती ए.एच.एम.डी. नवाज, न्यायमूर्ती, श्रीलंका सर्वोच्च न्यायालय.
- मा. न्यायमूर्ती सपना प्रधान मल्ला, न्यायमूर्ती, नेपाळ सर्वोच्च न्यायालय.

या सर्व मान्यवरांनी कायदा आणि तंत्रज्ञान यांच्यातील वाढत्या सहसंबंधावर प्रकाश टाकला. त्यांनी विविध देशांतील स्थानिक आव्हाने, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि नैतिक मर्यादा यांची सखोल चर्चा केली.

**परिषदेतील मुख्य विषय**

या दोन दिवसीय परिषदेत अनेक सत्रांमध्ये विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली, जसे की:

- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि कायदेशीर जबाबदारी
- डेटा गोपनीयता आणि सायबर सुरक्षेची गरज
- ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि कायदेशीर पारदर्शकता
- डिजिटल न्याय आणि न्यायालयीन प्रवेश
- बौद्धिक संपदा हक्क आणि नवप्रवर्तन
- उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नैतिक मूल्य

या चर्चासत्रांमध्ये न्यायमूर्ती, प्राध्यापक, कायदेविषयक व्यावसायिक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध कॉमनवेल्थ देशांतील दृष्टीकोनातून आलेल्या मतांनी चर्चेला समृद्ध केलं. ही

परिषद न्यायव्यवस्था आणि कायदे शिक्षण याला अधिक सशक्त करण्याचा सामूहिक निर्धार करून संपन्न झाली. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर, मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि नैतिक शासकीय मूल्ये यांना योग्य दिशा देणारे धोरण आणि शिक्षणप्रणाली तयार करण्यावर भर देण्यात आला.

**विद्यार्थ्यांची कामगिरी (Students Achivement)**

विद्या प्रसारक मंडळाच्या बी.एन. बांदोडकर महाविद्यालयाद्वारे अन्न आणि औषध प्रशासन ह्यांच्या समवेत इट राईट इंडिया स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ह्या स्पर्धेअंतर्गत घेण्यात आलेल्या ऑन द स्पॉट कुकिंगमध्ये आमच्या दुसऱ्या वर्षाच्या एलएलबीच्या विद्यार्थिनी शीतल पोहरकरने बाजरीच्या साहित्याचा वापर करून पॅटीज, लाडू आणि केक बनवले आणि दुसरे बक्षीस मिळवले. तसेच घोष वाक्य तयार करण्याच्या स्पर्धेत अलिझा इम्मान ह्या प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थिनीने द्वितीय पारितोषिक मिळविले.






- गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एन.बी. ठाकूर लॉ कॉलेज, नाशिक यांनी १७वी दिवंगत ॲड. डी.टी. जयभावे स्मृती राष्ट्रीय स्तरावरील मूट ट्रेल आणि जजमेंट लेखन स्पर्धा - २०२५ आयोजित केली होती. आमच्या महाविद्यालयातील द्वितीय वर्ष विधीचे विद्यार्थी श्री समीर पठाण, श्री. निशांत जोशी आणि मिस ज्ञानेश्वरी शिंदे ह्यांनी सदर स्पर्धेत साक्षीदारांच्या सर्वोत्तम परीक्षेचा Best Examination of Witness पुरस्कार पटकाविला.



- आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पाठ संस्था फेडरेशन आणि बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्री. गौरव गायकवाड एफ.वाय. एल.एल.बी, डिव्हिजन - डी, रोल क्र. २०९ ह्याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.



- डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, वडाळा आयोजित राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धा २०२५ मध्ये श्री. तुषार वारंग (TYLLB), श्री. शुभम सारंगुळे (TYLLB), कु. अदिती देहेरकर (FYLLB) ह्यांनी प्रथम पारितोषिक मिळवत विजेत्यांचा करंडक महाविद्यालयात आणला.

शक्य आणि अशक्य यांच्यातील अंतर हे आपल्या दृढनिश्चयावर अवलंबून असते.




- अनिकेत जाधव आणि श्री.संकेत प्रभाळे : व्हीपीएम जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या डॉ.व्ही.एन.बेडेकर स्मृती वादविवादात द्वितीय पारितोषिक पटकावले.



- श्री व्यंकटेश अय्यर, श्री निशांत जोशी, आणि मिहीर घांग्रेकर (द्वितीय वर्ष विधी) मधील विद्यार्थी यांनी कृष्णचंद चेलाराम लॉ कॉलेज, मुंबई येथे आयोजित लेजिस सेंट्रम २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट स्मृती (Best Memorial) पुरस्कार जिंकला.



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ मार्च २०२५ : डॉ. स्मिता जपे यांना सिडनहॅम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजतर्फे त्यांच्या प्राध्यापकांसाठी आयोजित प्राध्यापक विकास कार्यक्रमासाठी व्याख्यात्या म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी ‘रिसर्च डिझाइन’ या विषयावर ऑनलाइन सत्र घेतले.

१ मार्च २०२५ : ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे वार्षिक आंतर-महाविद्यालयीन व्यवस्थापन कार्यक्रम ‘एन्थुझिया ५.०’ आयोजित करण्यात आला ज्यामध्ये विविध संस्थांमधील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी १० वेगवेगळे खेळ आणि इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.






५ मार्च २०२५ : महिला आंतरराष्ट्रीय दिनाच्या पूर्वसंध्येला सॅटर्डे क्लब्स तर्फे महाराष्ट्रीय उद्योजकांसाठी, डॉ. स्मिता जपे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.





७ मार्च २०२५ : डॉ. स्मिता जपे यांच्या नेतृत्वाखाली ब्रिम्सच्या महिला विकास समितीतर्फे महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींसाठी 'महिलांचे शारीरिक, मानसिक सामाजिक स्वास्थ्य' या विषयावर डॉ. मनीषा बनकर यांचे सत्र आयोजित करण्यात आले.




तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, ब्रिम्सच्या आयक्यूएसी समितीतर्फे एनएसईच्या सहकार्याने 'आर्थिक जागरूकता' या विषयावर एक सत्र आयोजित करण्यात आले.



१९ मार्च २०२५ : एन. एम. कॉलेज ऑफ कॉमर्स येथे 'बँकिंग आणि फायनान्स' या विषयाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या प्रकल्प मुलाखतीसाठी सहाय्यक प्रा. प्रथमेश उमेश तावडे यांना बाह्य परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२९ मार्च २०२५ : सहाय्यक प्रा. अदिती दामले पवार यांनी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन परिषदेत (IBMR-IMC 2025) 'कॉर्पोरेट ग्लोबल सस्टेनेबिलिटी' या विषयावर 'एच आर स्ट्रॅटेजीज फॉर ड्रायविंग कॉर्पोरेट सोशल रिपोन्सिबिलिटी इन ग्लोबलाईज्ड इकॉनॉमी' या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला.

जागतिक शाश्वतता उद्दिष्टांशी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी संलग्न करण्यात मानवी संसाधन धोरणांची महत्त्वाची भूमिका या शोधनिबंधांमध्ये अधोरेखित करण्यात आली आहे.

२९ मार्च २०२५ : ब्रिम्सच्या प्राध्यापकांसाठी 'प्रत्येकासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)' या विषयावर एक प्राध्यापक विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन श्री. श्रीकांत मुळीक यांनी केले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात एआयचा वापर या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले.



२९ मार्च २०२५ : एस आय इ एस (SIES) मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटतर्फे आयोजित केलेल्या परिषदेत शोधनिबंध स्पर्धेसाठी सत्र अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता जपे यांना आमंत्रित करण्यात आले.


CERTIFICATE
OF GRATITUDE
Dr. Smita P. Jape (Dean Academics)
VPM's Dr. V.N. Bedekar Institute of Management Studies

●●●

# डॉ. वा. ना. बेडेकर यांचा एकविसावा स्मृतीदिन



डॉ. वा. ना. बेडेकर

दि. १ ऑगस्ट १९३५ स्थापन झालेल्या विद्या प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा कै. डॉ. वासुदेव नारायण बेडेकर यांनी १९५७ साली स्वीकारली. डॉ. वा. ना. बेडेकर यांचे अध्यक्षतेखाली विद्या प्रसारक मंडळाने मराठी व इंग्रजी माध्यम शाळा तसेच कला–वाणिज्य, विज्ञान, विधी महाविद्यालये, व्यवस्थापन अभ्यासक्रम विभाग, तंत्रनिकेतन, माहिती तंत्रज्ञान केंद्र अशा शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली. मंडळाच्या या सर्व शैक्षणिक संस्थामधून आजमितीस सुमारे १७००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर आजपर्यंत लाखो विद्यार्थी विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा–महाविद्यालयांतून शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत.

ठाण्याच्या या शिक्षण – महर्षी कै. डॉ. वासुदेव नारायण बेडेकर यांच्या एकविसाव्या स्मृतीदिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळातर्फे सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ संस्थेच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये माजी भारतीय प्रशासकीय सेवा आधकारी व चाणक्य मंडळ परिवार चे संस्थापक व संचालक श्री. अविनाश



धर्माधिकारी (भा.प्र.से.) यांचे, ‘बदलता काळ आणि युवक’ या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान पार पडले.

सध्या जगात झपाट्याने बदल होत आहेत. तसेच सध्या कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) च्या युगास सुरूवात झाली असून कृत्रिम बुद्धीमत्ते (एआय) च्या प्रभावामुळे सुमारे ६६ टक्के पारंपरिक रोजगार हे कालांतराने नष्ट होणार आहेत, तर कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) आधारित नव नवीन रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होणार असल्याचे श्री. धर्माधिकारी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सुचित केले. पुस्तकी ज्ञानाबरोबरच कौशल्य आधारित शिक्षणाचे महत्त्व त्यांनी विषद केले. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी मर्यादीत न ठेवता व्यक्तिमत्त्व विकासासाठी असावे. फक्त डॉक्टर वा इंजिनीअर होणे म्हणजेच यश नाही. तर आपल्या आवडीच्या विषयात मनापासून योगदान देऊ त्यात सर्वोच्च शिखर गाठावे. लेखक, कलाकार, क्रीडापटू, शिक्षक, संशोधक, प्रशासन इ. क्षेत्रांतही युवकांनी प्रगतीच्या संधी साधाव्यात. अशा प्रकारे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी मुक्त संवाद साधत श्री धर्माधिकारी यांनी युवकांना नवी ऊर्जा व प्रेरणा दिली. सदर व्याख्यानास अनेक विद्यार्थी, शिक्षक, संस्थेचे कार्यकारिणी मंडळ, तसेच संस्थेच्या शाळा महाविद्यालयांचे आजी माजी मुख्याध्यापक, संचालक व मान्यवर इ. ची उपस्थिती लाभली.







**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.